म. ग्रं. सं. ठाणें
विषय निबंध
सं. क्र. २९०५

REFBK-0018184

# माध्यमिक शिक्षणाच्या व्यवस्थापनाची नवी दिशा

म. ग्रं. सं. ठाणें
[विष]य निबंध
[क्र]. २१०५

१५०१

लेखक

ग. वि. अकोलकर
नासिक.

दि. ह. सहस्रबुद्धे
नागपूर.

# माध्यमिक शिक्षणाच्या व्यवस्थापनाची नवी दिशा

2704

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्वामित्व
अनुक्रम 64564 वि: निबंध
क्रमांक 2704 नोंद दि. 20/3/67

भावी शैक्षणिक विकासाच्या दृष्टीने

माध्यमिक शाळांचे व्यवस्थापन स्वायत्तमंडळातर्फेच का व्हावे

याबाबत उद्बोधक चर्चा

REFBK-0018184

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
ग्रंथालय
समृद्धी योजना
१९७०

लेखक

ग. वि. अकोलकर
नासिक.

दि. ह. सहस्रबुद्धे
नागपूर.

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
क्र. १९७८

किंमत १ रुपया

# – अनुक्रम –


| | | |
|---|---|---|
| | पूस्तिकेचे प्रयोजन | १ |
| १. | खाजगी व्यवस्थापनाच्या प्रेरणा | ५ |
| २. | खाजगी व्यवस्थापन : शिक्षणविकासास बाधक | १३ |
| ३. | शिक्षण–आयोग व खाजगी व्यवस्थापन | २२ |
| ४. | शिक्षण–आयोगप्रणीत विकासाचे मार्ग व खाजगी व्यवस्थापन | २६ |
| ५. | खाजगी व्यवस्थापन मौलिक सहाय्य करण्यास समर्थ आहे का ? | ३१ |
| ६. | शिक्षणसंस्थाने वाढू देणार काय ? | ४० |
| ७. | स्वायत्तमंडळातर्फे व्यवस्थापन | ४४ |

# पुस्तिकेचे प्रयोजन

गेल्या शंभर वर्षात शिक्षणाच्या, व्यवस्थापनाच्या व नियमनाच्या पद्धतीत आपल्या देशात फारसा फरक झालेला नाही. विशेषतः माध्यमिक शिक्षण लोकांच्या प्रयत्न–पुढाकाराने सुरू व्हावे व चालावे आणि शासनाने अनुदान द्यावे आणि आपल्या नियमावलीने आर्थिक, प्रशासकीय व बौद्धिकदृष्टचाही नियमन करावे ही जी पद्धति चालू झाली ती अजून तशीच चालू आहे. तिच्यावर पुर्नविचार करण्याची आवश्यकता आपणाला वाटलेली नाही, इतकी ती आता रूळली आहे. जणू काय अन्य व्यवस्थापन–नियमनपद्धति असूच शकत नाही व असलीच तर ती आमच्या समाजास मानवणारी नाही अशी आपली समजूत झाली आहे.

**नव्या गरजा, नवे व्यवस्थापनः**–स्वातंत्र्यप्राप्ती ही आपल्या राष्ट्रीय जीवनातील एक क्रान्तिकारक घटना आहे. तिने आपल्या जीवनाच्या अनेक अंगोपांगांच्या नियमनपद्धतीत आमूलाग्र बदल घडवून आणले आहेत पण अन्य क्षेत्राच्या मानाने शिक्षण क्षेत्र मात्र मागे रेंगाळत आहे. नव्या काळात शिक्षणाच्या ज्या नव्या गरजा निर्माण झाल्या आहेत व होत आहेत त्यांचे स्वरूप लक्षात घेता शिक्षणपद्धतीबरोबरच शिक्षणसंस्थांचे व्यवस्थापन कसे असावे ते स्पष्ट करून व्यवस्थापनाची नवी दिशा पुढे मांडणे हा या छोटचा पुस्तकाचा एकमेव हेतू आहे. लोकांच्या आशा, आकांक्षा व गरजा ज्याप्रमाणे बदलतात त्याप्रमाणे सामाजिक व आर्थिक व्यवहारांचे व्यवस्थापन व नियंत्रण यात बदल करणे अपरिहार्य असते. तसे बदल केले नाहीत तर त्या आशा आकांक्षा व गरजांची पूर्ति होत नाही.

**स्वायत्त मंडळातर्फे व्यवस्थापनः**–स्वातंत्र्यप्राप्तिनंतरचा गेल्या पंधरावीस वर्षाचा काळ लक्षात घेतला तरी आपण या सिद्धान्तानुरूप आपल्या नव्या आकांक्षा व गरजांनुसार सामाजिक व आर्थिक व्यवहारांच्या नियमनात प्रचंड फेरफार केले आहेत, असे आपणास दिसून येते. उदा. स्वातंत्र्योत्तर काळात शेती, उद्योग व कारखानदारी या क्षेत्रात खाजगी मालकी हक्क व संबंधित व्यवहारांचे व्यवस्थापन यात आपण मूलगामी बदल केले आहेत. जमीनदारी व मालगुजारी प्रथा आपण नष्ट केल्या आहेत, कुळकायद्याने स्वतः शेती न करणाऱ्या ऐतखाऊ, अनुपस्थित मालकाचे मालकी हक्क आपण काढून घेतले

आहेत. शेती व बागायती क्षेत्रातच नव्हे तर उद्योग, वन आणि श्रम या क्षेत्रांत सहकारी तत्त्वाचा अवलंब करून अनेक संस्था व सोसायटचा काढल्या आहेत. कंपनी कायद्यात मूलभूत स्वरूपाचे बदल करून कारखानदारी क्षेत्रात प्रथम आपण ' म्यॅनेजिंग एजन्सी ' पद्धतीचे नियमन केले व आता तर ती पद्धत संपूर्णपणे नष्ट करण्याचे आपण ठरविले आहे. मोठे महत्त्वाचे नवे कारखाने यापुढे स्वायत्तमंडळाद्वारे चालावे असे आपले धोरण आहे व त्या दृष्टीने आपण अनेक कार्पोरेशन्स स्थापन केल्या आहेत व करीत आहोत. कारखानदारी क्षेत्रात श्रमिकांचा अधिक विचार व्हावा एवढेच नव्हे तर त्यांना व्यवस्थापनातहि सहभागी करून घ्यावे असा विचार आपण करीत आहो. आयुर्विमा व्यवसायासारखा फार मोठा कोटयावधि रुपये भांडवल गुंतलेला व्यवसाय आपण एका स्वायत्तमंडळाकडे सोपविला आहे. आता तर आपण बँक व्यवसायावरहि सामाजिक नियंत्रणे आणण्याच्या मार्गावर काही पावले टाकली आहेत. हे सर्व बदल करण्यामागे आपण स्वातंत्र्योत्तर काळात ठरविलेली सामाजिक न्याय, समता, संधीची समानता आदि उद्दिष्टे साध्य करण्याची आपली दृष्टी आहे, तसेच त्या व्यवहारांचे कार्यक्षम नियमन व्हावे असा आपला प्रयत्न आहे.

**शिक्षण व्यवस्थापनात बदल आवश्यकः**–शिक्षणाच्या व्यवस्थापनाच्या व नियमनाच्या बाबतीतहि असेच परिवर्तन करण्याची आवश्यकता आहे. तिची कारणे प्रामुख्याने दोन आहेत. एक तात्त्विक व दुसरे व्यावहारिक.

**तात्त्विक कारणः**–तात्त्विक कारण स्वातंत्र्योत्तर काळात भारतीय जीवनाच्या उद्दिष्टांशी संबंधित आहे. भारतीय राज्यघटनेच्या सरनाम्यात आपण त्या उद्दिष्टांचा उद्घोष केला आहे. जीवननिष्ठा व जीवनाचा मार्ग म्हणून आपण लोकशाहीचा स्वीकार केला आहे. लोकशाही मार्गाने समाजवादी समाजरचना हे आपले उद्दिष्ट आपण ठरविले आहे. सर्वत्र क्षेत्रातील पिळवणूक थांबविणे, व्यक्तीची प्रतिष्ठा जोपासणे आणि तिच्या विकासातील अडथळे दूर करणे, जाति–धर्म–लिंग–धन यामुळे उत्पन्न होणारे उच्चनीच भेद बाजूला सारून सर्वांना विकासाच्या संधी उपलब्ध करून देणे हा त्या उद्दिष्टांचा तपशील आहे. **अशी नवी समाजनिर्मिती करण्याचे शिक्षण हे प्रभावी साधन आहे,** असे मुदलियार आयोगापासून कोठारी आयोगापर्यंत सर्वजण आवर्जून सांगत आहेत. याचा अर्थ शिक्षण व्यवस्थेतून लोकशाहीनिष्ठ समाजवादास पोषक असे संस्कार विद्यार्थ्यांना संस्कारक्षम वयातच लाभले पाहिजेत असा आहे. शाळेच्या व्यवस्थापनाचा साचा व शिक्षण–संस्थेभोवतालचे वातावरण

जर या उद्दिष्टांना पोषक नसेल तर ती साध्य होणार नाहीत. वरील शैक्षणिक उद्दिष्टे साध्य करण्यासाठी परिसरशाळा, समानशाळा पद्धती, समूह–शाळा या सारखे मार्ग कोठारी शिक्षण आयोगाने सुचविले आहेत. प्रश्न असा आहे की हे मार्ग व आजची व्यवस्थापन पद्धती यांचा सांधा जुळणार आहे का ? नसेल तर आजची व्यवस्थापन पद्धती कालबाह्य आहे असे समजून ती बदलून तिच्या जागी नवी व्यवस्थापन पद्धती निर्माण करणे आवश्यक नाही का ? समाजवादी समाजरचनेस पोषक अशी शिक्षणपद्धती व शिक्षणसंस्थाची व्यवस्थापनपद्धती निर्माण करणे ही ऐतिहासिक गरज आहे असे आमचे प्रांजल मत आहे.

**व्यावहारिक कारण**:–ही नवी व्यवस्था निर्माण करण्याचे तितकेच महत्त्वपूर्ण असे व्यवहारिक कारणहि आहे. गेल्या दहावीस वर्षात शिक्षणाच्या अमाप विस्તારाबरोबरच शिक्षणसंस्थांच्या व्यवस्थापनात अनेक दोषहि शिरले आहेत. आजच्या सरकारी, निमसरकारी व खाजगी व्यवस्थापनात शिरलेल्या दोषांची चर्चा कोठारी शिक्षणआयोगाच्या व अन्य पुराव्यांच्या आधारे आम्ही पुढे करणारच आहो. येथे एवढेच नमूद करू इच्छितो की आजचे व्यवस्थापन या दोषांमुळे शैक्षणिक उद्दिष्टे गाठण्यास व त्या उद्दिष्टाप्रत जाण्याचे मार्ग अनुसरण्यास केवळ असमर्थच नव्हे तर अडसर बनले आहे. शिक्षणात जिवंतपणा व व्यवस्थापनात गतिमानता निर्माण करावयाची असेल तर व्यवस्थापनाची पुनर्रचना तातडीने करण्याची गरज आहे.

**अनुदान पद्धतीत** बदल:–महाराष्ट्रातील शिक्षणाच्या व्यवस्थापनपद्धतीत तत्काळ बदल करण्याचे आणखी एक महत्त्वाचे कारण आहे. ते म्हणजे महाराष्ट्रशासनाने अनुदानपद्धतीत केलेले क्रान्तिकारक परिवर्तन व त्यावरील प्रतिक्रिया.

**सरकारची जबाबदारी ?**–शिक्षणात चैतन्य यावे म्हणून महाराष्ट्राचे लोकप्रिय शिक्षणमंत्री माननीय श्री मधुकरराव चौधरी गेली चार पाच वर्षे अत्यंत आस्थेने व जिद्दीने झटत आहेत. शिक्षणाचा मंत्र व तंत्र यांचे ते जाणकार आहेत. शिक्षणव्यवस्थेतील मरगळ घालवून तिच्यात जिवंतपणा आणण्यासाठी त्यांनी प्रयत्न सुरु केले आहेत. त्यातील मुख्य प्रयत्न शिक्षणव्यवस्थेचा कणा असलेला जो शिक्षक त्याची आर्थिक स्थिती सुधारणे व त्याला सेवाशाश्वति व सेवा संरक्षण मिळवून देणे हा होय. संस्थांच्या आर्थिक दुरवस्थेमुळे अनेक शिक्षणसंस्थात अनेक भ्रष्टाचार सुरू झाले आहेत व त्यांचा संकलित परिणाम शिक्षक व शिक्षणाचा दर्जा यावर झाला आहे, हे जाणून मा. शिक्षणमंत्र्यांनी

अनुदानसूत्रात इतका मूलभूत स्वरुपाचा बदल केला की त्यामुळे शासन व खाजगी व्यवस्थापन यांच्या या क्षेत्रातील भूमिकाच पार बदलल्या. शंभर वर्षापूर्वी (इ. स. १८५९) जेव्हा सर्वप्रथम अनुदान (ग्रँट-इन-एड) पद्धती सुरू झाली त्यावेळी माध्यमिक शिक्षणाचा प्रसार जनतेने करावा व सरकार **जमेल तेव्हा शक्य असेल तर** काही मदत अनु-दान रूपाने करील असे सरकारी धोरण ठरले होते. ग्रँट इन एड याचा अर्थच मुळी सहाय्य म्हणून काही आर्थिक मदत देणे होय-जबाबदारी स्वतः घेणे नव्हे.

**खाजगी व्यवस्थापन : लहान भागीदार**:-पण स्वातंत्र्य प्राप्त होताच या धोरणात बदल झाला. चौदा वर्षे वय पूर्ण होईपर्यंतचे शिक्षण सक्तीने व फी विना देण्याची जबाबदारी शासन स्वीकारील असे नवे धोरण खुद्द घटनाकारांनीच घोषित केले. महाराष्ट्रशासनाने ती जबाबदारी यथाशक्य पाळण्याचा प्रयत्न तर केलाच पण त्याबरोबरच माध्यमिक शाळांच्या खाजगी व्यवस्थापनाला देण्यात येणाऱ्या अनुदानात वाढ केली, ई. बी. सी. सारख्या योजना आखून आर्थिक दृष्टचा मागासलेल्या वर्गातील ज्या विद्यार्थ्यांना माध्यमिक व उच्चशिक्षण घ्यावयाचे असेल त्यांना ते देण्याची जबाबदारी शासनाने स्वीकारली. आता गत वर्षात माध्यमिक शाळांच्या आवर्ती खर्चातील ९७३।९९ टक्के खर्चाची जबाबदारी शासनाने घेतली असे घोषित करून पर्यायाने माध्यमिक शिक्षणाची जवळजवळ पूर्ण जबाबदारी शासनाने स्वीकारली आहे. **आता जमेल तर जमेल तेव्हा जमेल तितकी मदत** देण्याचे धोरण संपले आहे. आता खाजगी व्यवस्थापनाला केवळ २३।१ टक्का जबाबदारी घेण्यास सांगितले आहे त्यामुळे शासन व व्यवस्थापन यांच्या भूमिकात मूलगामी बदल झाला आहे.

**पुर्नविचार आवश्यक**-अशा नव्या परिस्थितीत खाजगी व्यवस्थापनाचे अधिकार व आस्तित्त्व किती समर्थनीय आहे याचा नव्याने विचार होणे अवश्य झाले आहे. मा. शिक्षणमंत्र्यांच्या नव्या धोरणाला बऱ्याच खाजगी संस्थांच्या व्यवस्थापकांनी ज्या कारणांनी ज्याप्रकारे प्रतिकूल प्रतिक्रिया व्यक्त केल्या त्यामुळे तर हा विचार अती निकडीने होण्याची आवश्यकता आहे. या सर्व कारणांच आढावा घेऊन, त्यांची छाननी करून शैक्षणिक संस्थांच्या व्यवस्थापनाकरता स्वायत्त महामंडळाच्या (एज्युकेशन कॉर्पोरेशन) निर्मितीची कल्पना या पुस्तिकेत पुरस्कारिली आहे. ती सप्रमाण पुढे मांडणे हेच या पुस्तिकेचे प्रयोजन.

५ ... १०



# खाजगी व्यवस्थापनाच्या प्रेरणा

राष्ट्रसंजीवनकार्यात शिक्षणाचे महत्त्व नव्याने वर्णन करण्याची आवश्यकता नाही. त्याकरता शिक्षणाच्या प्रसाराबरोबर शिक्षणाचा दर्जाहि सतत वाढवत ठेवावा लागतो. या मार्गाने समृद्धीचा मार्ग खुला करीत असता विकसनशील राष्ट्रात साधनसामग्रीचा अपुरेपणा ठायीठायी जाणवतो म्हणून विकसनशील देशात सदा अपुऱ्या पडत जाणाऱ्या सामग्रीचा कमाल उपयोग करून घेण्याची आवश्यकता असते. द्रव्यबळ व मनुष्यबळ म्हणजेच साधनसामग्री नव्हे. राष्ट्रीय उद्दिष्टे जलद गाठायची तर शिक्षण-उद्दिष्टांनुसार चालणारे शिक्षणसंस्थांचे संस्थापन व प्रशासन यांचाहि त्यात समावेश असतो. किंबहुना भारताचा तसाच अन्य राष्ट्रांचा शिक्षण इतिहास आपण पहिला तर आपणाला असे दिसून येते की शिक्षण उद्दिष्टांनुरूप द्रव्यबळाचा व मनुष्यबळाचा कमाल उपयोग होण्याकरता शिक्षणसंस्थांच्या संस्थापकांची प्रेरणा शिक्षण उद्दिष्टांस पोषक अशीच असली पाहिजे. स्वातंत्र्यप्राप्तिनंतर भारताने आपल्यासमोर समाजरचनेची नवी उद्दिष्टे ठेवली आहेत. त्या उद्दिष्टांप्रत जाण्याकरता शिक्षणव्यवस्थेने कोणत्या मार्गांचा अवलंब केला पाहिजे, ते कोठारी आयोगाने नुकतेच अधिक स्पष्टपणे सांगितले आहे. त्यांच्या अवलंबनास कोणत्या प्रकारचे व्यवस्थापन सहाय्यभूत होईल हे ठरविण्याकरता प्रथम आजच्या व्यवस्थापनाचे त्या दृष्टीने मूल्यमापन करणे अवश्य आहे.

**प्रमुख व्यवस्थापन** :—महाराष्ट्रात माध्यमिक शिक्षणसंस्था चालविणारी सरकारी, निमसरकारी व खाजगी अशी मुख्यत: तीन प्रकारची व्यवस्थापने आहेत. यापैकी खाजगी व्यवस्थापन सर्वात प्रमुख होय.

**व्यवस्थापनानुसार महाराष्ट्रातील माध्यमिक स्तरावरील सर्व प्रकारच्या शाळा, १९६६–६७.**

| | सरकारी | जि. परिषद | नगरपरिषद | खाजगी | एकूण |
|---|---|---|---|---|---|
| मुंबई विभाग | ७ | ५ | ३२ | १४०० | १४४४ |
| पुणे विभाग | ४ | ६ | ११ | १०९६ | १११९ |
| नागपूर विभाग | ४ | १६१ | ४७ | ८३५ | १०४८ |
| औरंगाबाद विभाग | १ | ३८४ | — | २६५ | ६५० |
| एकूण | १६ | ५५६ | ९० | ३५९९ | ४२६१ |

यावरून महाराष्ट्रातील एकूण ४२६१ माध्यमिक शाळांपैकी ३५९९ म्हणजे जवळजवळ ८५ टक्के शाळा खाजगी व्यवस्थापनाखाली होत्या हे दिसून येईल. भारतात हे प्रमाण १९६०-६१ साली ६९ टक्के होते. खाजगी व्यवस्थापनाचा एवढा प्रचंड विस्तार कोणत्या परिस्थितीत कोणत्या प्रेरणांमुळे झाला हे आपण पाहू.

**परकीय खाजगी व्यवस्थापनाची प्रेरणा : ख्रिस्त धर्मप्रसार** :–भारतावर आक्रमण करणारे पहिले पाश्चात्य पोर्तुगीज होत. श्री सिक्वेरा यांनी म्हटल्या-प्रमाणे नारळ, मसाला व वेलदोडे यांचा केवळ व्यापार करण्याकरता ते भारतात आले नव्हते. भारतात ख्रिश्चनधर्माचा प्रसार करण्याचा त्यांचा उद्देश होता. त्याप्रमाणे त्यांनी गोवा, दीव, दमण येथे शाळा काढल्या व खिस्तीधर्मप्रसाराच्या उद्देशानेच त्या चालवल्या. शाळांव्यतिरिक्त अन्य प्रकारेहि त्यांनी हा प्रसार अतिरेकीपणे चालविला. पुढे त्याची फळे त्यांना लवकरच भोगावी लागली हे आपणा सर्वांना माहीत आहे. पण शाळा काढण्याची प्रेरणाहि ख्रिस्ती धर्माचा प्रसार ही व एवढीच होती हे आपण ध्यानी बाळगले पाहिजे.

**फ्रेंच व इंग्रज मिशन व्यवस्थापने**–यानंतर आलेल्या डच, फ्रेंच व इंग्रज लोकांनी आपापल्या प्रदेशात मिशनऱ्यांकरवी शाळा स्थापून व चालवून ख्रिस्त-धर्मप्रसार करण्याचाच प्रयत्न केला. १६८९ साली ईस्ट इंडिया कंपनीच्या नियामक मंडळाने चॅप्लेनस् नेमण्याची व्यवस्था केली तेव्हा कंपनीने धर्मादाय शाळा काढल्या व कंपनी त्यांना दान-अनुदान रूपाने मदत करू लागली.

**स्वधर्म व स्वसंस्कृति रक्षण**–इस. १६०० ते १८०० या दोनशे वर्षांच्या काळातील पाश्चात्यांच्या शिक्षणसंस्थाद्वारे ख्रिश्चन धर्मप्रसाराच्या धोरणाची प्रतिक्रिया म्हणूनच भारतात स्वधर्म, स्वसंस्कृति व स्वभाषा रक्षणाची जागृति झाली. १९ व्या शतकाचे सुरवातीस ब्राह्मो समाज, आर्यसमाज आदि जी जन-आंदोलने उभी राहिली त्या सर्वांची प्रेरणा स्वधर्म व स्वसंस्कृति रक्षणाची होती, हे त्यांच्या नांवावरून व कार्यावरून स्पष्ट आहे. भारतातील व महा-राष्ट्रातील त्या काळच्या शैक्षणिक प्रयत्नांना मिशनरी विरोधाची तीव्र धार होती ती यामुळेच.

**कंपनीचे शासकीय कर्तव्य**:–१९ व्या शतकाच्या सुरवातीस ईस्ट इंडिया कंपनीचे व्यापारी स्वरूप जाऊन तिला राजकीय स्वरूप आले. तेव्हा जन-हिताकरता काही करणे कंपनीला अवश्य झाले. म्हणून १८१३ च्या सनद

कायद्यात एतद्देशीय वाङ्मय व पंडीत यांना उत्तेजन देणे हे कंपनीकर्तव्य म्हणून समाविष्ट करण्यात आले.

**पौर्वात्य की पाश्चिमात्य**–या कलमाचा परिणाम म्हणून पुढे भारतात शिक्षण द्यायचे ते पौर्वात्य की पाश्चिमात्य असा वाद झाला. त्या वादात भारतीय शिक्षणपद्धतीचे उद्दिष्ट रंगाने हिंदी पण बुद्धीने ब्रिटिश नागरिक तयार करणे असावा हे लॉर्ड मेकॉलेचे मत सुप्रसिद्ध आहे. या मताप्रमाणेच शिक्षण-संस्थांचे प्रशासन व व्यवस्थापन व्हावे अशी सर्व काळजी त्याने घेतली.

**खाजगी व्यवस्थापनाची प्रेरणा : मेकाले मतविरोध**–मेकालेच्या या मताचा व त्या अनुसार ब्रिटिश राज्यकर्त्यांनी अवलंबिलेल्या धोरणाचा विरोध हीच १९५० पूर्वीच्या शंभर वर्षांत खाजगी शिक्षणसंस्था संस्थापकांची व व्यवस्था-पनांची प्रेरणा होती; हे शैक्षणिक प्रेरणांच्या पुढील संक्षिप्त इतिहासावरून दिसून येईल.

**राष्ट्रीय शाळा संस्थापकांची प्रेरणा : प्रखर राष्ट्रनिष्ठा**–परकीयांच्या शैक्षणिक धोरणास प्रखरपणे विरोध करणाऱ्या खाजगी शिक्षणसंस्थांच्या संस्था-पकांपैकी शुद्ध राष्ट्रीय शिक्षणशाळांच्या संस्थापकांस व व्यवस्थापकांस अग्रक्रम देणे अवश्य आहे. महाराष्ट्रात अशा राष्ट्रीय शाळांची स्थापना कोल्हापूरच्या श्री शाहू महाराजांच्या सेवेतून कै. विजापूरकरांना मुक्त व्हावे लागले, त्यामुळे व त्यानंतर १९०६ साली झाली. सरकारमान्य संस्था सरकारीं अनुदान घेत. या अनुदानाचे आधारे सरकार या संस्थांच्या व्यवस्थापनावर दडपण आणीत असे. कै. विजापूरकरांची कोल्हापूरच्या हायस्कूल नोकरीतून मुक्तता हे याच दडपणाचे एक उदाहरण आहे. त्यावेळी खर्चाच्या $\frac{1}{4}$ अनुदान मिळे म्हणून लो. टिळक या $\frac{1}{4}$ अनुदानाला 'चतकोर भाकरीची गुलामगिरी' म्हणत. ती स्वीकारणे त्यांना असह्य असे. ती न स्वीकारता शुद्ध व प्रखर राष्ट्रीय शिक्षण देणे ही राष्ट्रीय शाळा संस्थापकांची प्रेरणा होती.

**एक सुवर्ण पान:**–५०–६० वर्षांच्या इतिहासात राष्ट्रीय विचारांच्या व चळवळीच्या भरती ओहोटीनुसार राष्ट्रीय शाळांना बरेच हेलकावे खावे लागले. ध्येयधोरणाकरता राष्ट्रीय शाळांच्या व्यवस्थापकांनी भिक्षांदेहि केली पण 'चतकोर भाकरीची' भीक घेतली नाही. राष्ट्रीय शाळांचे संस्थापक, व्यवस्था-पक व शिक्षक सदाच थोडे होते पण निष्ठावंत ध्येयवादी होते. ध्येयानुसार धोरण ठरवून त्याकरता त्यांनी अपार कष्ट सहन केले. अनुपम स्वार्थत्याग करून त्यांनी शेकडो तरुणांना राष्ट्रसेवेची व पारतंत्र्यविमोचनाची स्फूर्ति दिली.

म्हणूनच त्यांचे कार्य भारतीय शिक्षणाच्याच नव्हे तर स्वातंत्र्यसंग्राम इतिहासातही एक सुवर्णपान आहे.

**प्रेरणेचे उज्वल दर्शन**–शाळांचे संस्थापन व व्यवस्थापन या मागील प्रेरणा व परिणाम यांच्या एकरूपतेचे उज्वल दर्शन शुद्ध राष्ट्रीय शिक्षणशाळांच्या व्यवस्थापनाच्या उदाहरणाव्यतिरिक्त अन्यत्र कोठेहि दिसत नाही.

**खाजगी अनुदान संस्थांचे प्रयोजन**:–प्रखर राष्ट्रीय शिक्षणाच्या या त्यागमय मार्गाने जाणे अनेकांना शक्य नव्हते. शाळा संपूर्ण स्वतंत्र ठेवली तर मुले बहुसंख्येने येत नसत व सरकारी मान्यता घेतली तर शिक्षण व्यवस्थापनातील तेज नाहीसे होत असे. कै. आपटे गुरुजींनी आपल्या 'राष्ट्रीय शिक्षणाच्या इतिहासात' म्हटले आहे, '**ब्रिटिश सरकार मनापासून शिक्षणाचा प्रसार हिंदुस्थानात करणार नाही म्हणून देशातील सुबुद्ध लोकांनी स्वार्थत्यागपूर्वक खाजगी शिक्षणसंस्था स्थापून सर्व थरातील लोकांना अल्प खर्चात शिक्षण देण्याची व्यवस्था केली. पाहिजे.**' अनुदान घेऊन शाळा चालवू इच्छिणारांची ही भूमिका होती. आज ज्याला आपण खाजगी व्यवस्थापन म्हणतो त्यामागील हे प्रयोजन होते.

**महात्मा फुले यांची शैक्षणिक झेप**:–ब्रिटिश कंपनी भारतात शिक्षण प्रसार समाजाच्या सर्व स्तरात करणार नाही म्हणून सुबुद्ध भारतीयांनीच ते कार्य स्वार्थत्यागपूर्वक केले पाहिजे हे १८५४ सालच्या खलित्यानुसार अनुदान पद्धती सुरू होण्यापूर्वीच अनेक भारतीयांनी जाणले होते. महाराष्ट्रात याचे सर्व प्रथम श्रेय महात्मा ज्योतिबा फुले यांना दिले पाहिजे. त्यांनी १८५२ व १८५३ सालीच पुणे येथे अस्पृश्य वर्गातील मुलींकरता शाळा काढली होती. हा या प्रकारचा सर्व प्रथम प्रयत्न होता. १८५२ साली तो महात्मा फुले यांनी केला त्यावरून त्यांच्या विचाराची शैक्षणिक झेप किती दूरवरची होती हे प्रयत्नास येते.

**न्यू इंग्लिश व नील सिटी स्कूलची स्थापना**:–ब्रिटिशांची शिक्षण विषयक नीति व अनुदानपद्धति ठरल्यावर झालेला व आजपर्यंत टिकलेला प्रयत्न म्हणजे पुणे येथील न्यू इंग्लिश स्कूल (१८८०) व नागपूर येथे नील सिटी हायस्कूल (दा. धनवटे नगर विद्यालय) (१८६९) यांची स्थापना होय.

**त्यागपूर्वक राष्ट्रसेवेची प्रेरणा**:–स्वधर्म स्वभाषा व स्वसंस्कृति यांच्या जळजळीत अभिमानाचे दर्शन ज्यांनी आपल्या निबंधमालेतून दिले होते त्या कै. विष्णुशास्त्री चिपळूणकरांनी सरकारी हायस्कूलातील नोकरी सोडून पुणे

येथे न्यू इंग्लिश स्कूलची स्थापना इ. स. १८८० साली केली. त्याच भावनेने भारलेले श्री टिळक व श्री आगरकर सहकारी म्हणून त्यांना येऊन मिळाले. कोणत्याहि प्रकारचा त्याग करण्यास ही मंडळी तयार होती पण हजारो विद्यार्थ्यांना सुशिक्षण देऊन जागृत करणे अवश्य, या विचाराने लो. टिळकांचा सरकारशी पूर्णपणे फटकून वागण्याचा सल्ला पुढे या शाळेच्या संस्थापकांनी मानला नाही. आपद्धर्म म्हणून त्यांनी अनुदान स्वीकारले. पण राष्ट्रप्रेमाची ज्योत प्रज्वलित करण्याचे कार्य बनेल त्या मार्गाने उघडपणे वा गुप्तपणे चालूच ठेविले. याचे कारण याकाळच्या सर्व शिक्षणसंस्थांच्या संस्थापकांची प्रेरणा त्यागपूर्वक राष्ट्रसेवेची होती.

**आजीव सेवक पद्धति:**--या काळी स्थापन झालेल्या सर्व शाळांच्या संस्थापकांची भावना राष्ट्रसेवेला समर्पणाची असे. आजन्म तेच कार्य करण्याचा त्यांचा निर्धार असे म्हणून याकाळी शिक्षणसंस्था आजीवसेवक पद्धतीवर उभारल्या गेल्या. राष्ट्रप्रेम प्रज्वलित करण्याचे कार्य राष्ट्रीय लढ्यांचे वेळी खंडित होत असे, पण या प्रकारच्या अनुदानित शाळांचे अखंडितपणे चाले. भारतात व विशेषत: महाराष्ट्रात १९०७-१९०८, १९२०-२१ व १९३०-३१ साली झालेल्या राष्ट्रीय आंदोलनांचे वेळी या अनुदानित संस्थाची व्यवस्थापने आपल्या मूळ ध्येय धोरणानुसार शक्य तो वागत व राष्ट्रीय स्वातंत्र्यसंग्रामाला बनेल त्या मार्गांनी मदतहि करीत.

पण १९३० नंतर हा काळ पालटला.

**१९३० नंतर प्रेरणेत बदल:**–१९३० नंतर सर्व जगात व भारतात मंदीची लाट आली. यानंतर संस्थापकांच्या प्रेरणांत स्पष्ट बदल झाला.

**उदरनिर्वाहाची प्रेरणा:**–मंदीच्या काळात शिक्षण व त्यागपूर्वक देशसेवा यांचा संबंध दुरावत चालला. पोटाचा उद्योग म्हणून अनेक पदवीधर खाजगी शिक्षणसंस्था, विशेषत: माध्यमिक शाळा, स्थापन करू लागले. त्यांच्या ओठावर चिपळूणकर-टिळक-आगरकरांची नावे असली तरी कृतीत उदरनिर्वाहाची दृष्टी प्रमुख होती. फारशी झीज न सोसता आपल्या उक्तीप्रमाणे थोडी कृती करण्याची त्यांची तयारी असे. प्रसंगी स्वातंत्र्य आंदोलनास मदतहि ते करीत पण सरकारची गैरमर्जी न होऊ देण्याची काळजी ते वहात.

**१९३६-३७ नंतर :**–१९३६-३७ साली प्रांतिक स्वायत्तता आली. लोकनियुक्त शिक्षणमंत्र्यांनी शिक्षणप्रसाराकडे लक्ष देण्यास सुरवात केली. पूर्वीच्या

स्वातंत्र्य-आंदोलनामुळे जनतेचे लक्षहि शिक्षणप्रसाराकडे आकृष्ट झाले. पूर्वी शिक्षणप्रसार उच्चवर्गीयांची मिरासदारी होती. बहुजनसमाजात जागृती व शिक्षणाबद्दल रुची उत्पन्न झाली, त्यामुळे ही मिरासदारी संपली. बहुजन-समाजाचे नेते बहुसंख्येने शिक्षणप्रसार करण्याकरिता पुढे आले. त्यामुळे शिक्षण-प्रसार झपाट्याने होऊ लागला. तो इतका की १९३६-३७ ते १९४६-४७ च्या फक्त दहा वर्षात भूतपूर्व मुंबई राज्यातील माध्यमिक शाळांची संख्या दुप्पट (८०४) झाली.

**अनियंत्रित कारभाराचा काळ :**-या काळात सरकारी निर्बंध हस्तक्षेप तसेच अनुदानसंहितेचे नियंत्रण नसल्याइतकेच होते-खाजगी व्यवस्थापनाचे दृष्टीने हा काळ अनियंत्रित कारभाराचा काळ होता. १९३० ते १९४७ हा काळ सरकारी अडचणी व निर्बंध यातून त्यागपूर्वक मार्ग काढण्याचा काळ नव्हता. लोकांच्या इच्छेचा भरपूर लाभ घेण्यासारखी परिस्थिती निर्माण झाली होती. साहजिकच या काळात संस्थापकांच्या प्रेरणा बदलल्या व त्यामुळे शाळांच्या व्यव-स्थापनाचा दर्जाहि घसरला.

**भिन्न प्रेरणेनुसार व्यवस्थापनाचा घसरता दर्जा:**-आजीवसेवकी शाळात संस्थे-साठी सर्वस्व अर्पण करण्यास निघालेल्या व्यक्तींना घरदार व मुलेबाळे आहेत, त्यांची आबाळ होऊ नये असा विचार आता सुरू झाला. त्यामुळे त्यांना घर, विमा, सेवानिवृतिवेतन, खास भविष्यनिधी आदिरूपाने सवलती देणे सुरू झाले. पूर्वी केलेल्या त्यागाचा मोबदला वा जन्मभर करणार असलेल्या सेवेचा मोबदला म्हणून अधिक पगाराचे व सवलतीचे समर्थनहि होऊ लागले.

संस्थेचा विस्तार होत गेल्याने आजीव सेवकांनी अन्य शिक्षक वर्ग मदतीस घेतला पण त्यांना स्थान मात्र समानतेचे दिले नाही. त्यामुळे सेवक-मालक असे गट तयार झाले. पुढे आजीव सेवकातहि गट पडणे सुरू झाले. नाकापेक्षा मोती जड होऊ नये म्हणून अगदी अवश्यच झाले तर आजीवसेवक, आपल्यापेक्षा कमी कर्तृत्वाच्या शिक्षकांना, आजीव सेवक म्हणून घेऊ लागले.

**प्रत्यक्षाप्रत्यक्ष मालकी हक्क :**-मंदीच्या काळात दुसरा अगदी निराळ्या प्रकारचा संस्थास्थापकांचा वर्ग आस्तित्वात आला. स्वतःच्या शिक्षणाचा व अन्य बेकार शिक्षितांच्या गरजूपणाचा फायदा घेण्याची त्यांचीं दृष्टी होती. यापैकी कांहीनी केवळ स्वतः गबर होण्याची वृत्ति ठेवून स्वमालकीच्या शाळा सुरू केल्या तर अन्य कांहीनी स्वतःचे पुढाकारित्व कायम राहील अशा प्रकारे आपल्या नात्यागोत्याचे, मित्रत्वाचे स्वकीय घेऊन 'संस्था' स्थापन केल्या. या

काळातील हे संस्थापक प्राय: त्या त्या शाळांचे मुख्याध्यापक झाले. या काळात स्थापन झालेल्या कित्येक संस्था अशा प्रकारे कमी अधिक प्रमाणात 'कुटुंबसंस्था'च आहेत. अशा शाळात मुख्याध्यापकाचे हाती व्यवस्थापनाची सर्व सत्ता असते. आपल्यास पाहिजे तो निर्णय व्यवस्थापक-मंडळाकडून मुख्याध्यापक करून घेऊ शकतात. आपल्या सोईप्रमाणे ते सदस्यातहि बदल करून घेतात.

**स्वातंत्र्य प्राप्तीनंतर** :–यानंतरचा कालखंड स्वातंत्र्यप्राप्तीनंतरचा. स्वातंत्र्यप्राप्तीमुळे सामान्यजनांच्या आकांक्षा एकदम ऊंचावल्या. शिक्षणाविषयी जनसमाजात विशेष आस्था निर्माण झाली. नवीन शासन शिक्षणप्रसारास उत्सुक होते. या परिस्थितीचा लाभ घेण्यास अनेक जनसेवक पुढे येऊ लागले. त्यात जनसेवेची भावना व थोडे कष्ट करण्याची तयारी होती पण नेतेपणा मिळविण्याचा हव्यास प्रमुख होता.

याप्रमाणे संस्थापकांच्या प्रेरणांचा दर्जा घसरत चालला त्याचा परिणाम शाळेच्या व्यवस्थापनावर स्पष्टपणे दिसू लागला. शैक्षणिक दृष्टी कमी व मालकी हक्क गाजविण्याची इच्छा प्रबळ यामुळे अपवाद वगळता जुन्या नव्या शाळांच्या व्यवस्थापनात बरेच गैरप्रकार सुरू झाले.

वाढत्या गैरप्रकारामुळे व कल्याणकारी राज्याची कल्पना आणि जाणीव अधिक स्पष्टपणे झाल्यामुळे शाळांच्या व्यवस्थापनावर निर्बंध घालणे शासनाला आवश्यक वाटले. भूतपूर्व मुंबई राज्यात अनुदान नियम याच काळात तयार करण्यात आले.

**प्रेरणा प्रतिष्ठासाधनाची : शाळांची अनिर्बंध वाढ** :–साधारणत: १९५५–५६ पासून राज्यसरकारांनी शिक्षणप्रसाराकडे विशेष लक्ष व सढळ मदत देण्याचे धोरण स्वीकारले. १९६० साली महाराष्ट्र सरकारने विशिष्ट वार्षिक उत्पन्नापेक्षा कमी उत्पन्न असणाऱ्या पालकांच्या मुलांची फी व्यवस्थापनास देण्याची इ. बी. सी. योजना सुरू केली. यामुळे शाळा संस्थापन म्हणजे विनात्याग एवढेच नव्हे तर विनाकष्ट केवळ प्रतिष्ठा संपादन करण्याचे फार मोठे साधन उत्पन्न झाले. उक्ती देशसेवेची पण कृती पूर्णपणे प्रतिष्ठासाधनाची अशी स्थिती झाली. त्यामुळे महाराष्ट्रसरकारकडे शाळा स्थापण्याची परवानगी मागण्याकरता ५००।५०० अर्ज दरवर्षी येऊ लागले, 'लोकसेवा' करण्याची संधि मिळावी म्हणून शिक्षणाधिकारी व शिक्षणमंत्री यांचेवर दडपणे येऊ लागली. त्या दडपणांचा कणखर विरोध नवी लोकराज्ये करू शकली नाहीत. परिणाम-

स्वरूप महाराष्ट्रात सरकारी पाहणीचे सर्व संकेत मोडून, जरूर होती व नव्हती तेथे माध्यमिक शाळा स्थापन झाल्या. १९५९–६० ते १९६५–६६ या सहा वर्षांत महाराष्ट्रात माध्यमिक शाळांची संख्या दुप्पट (२११० जागी ४०३३) झाली.

**१९६७ साली ४२६ शाळांची स्थापना :–**१९६६ साली परवानगी देण्याबाबत महाराष्ट्र शासनाने कणखर राहण्याचा प्रयत्न केला. तेव्हा एका इच्छुक संस्थापकाने उच्च न्यायालयात तक्रार दाखल केली. मिळालेल्या निर्णयानंतर थोडक्या काळात आवश्यक ती कारवाई करण्यास शासन असमर्थ झाल्यामुळे शासनाने परवानगीचा नियम शिथिल केला. परिणामस्वरूप जून–जुलै १९६७ मध्ये महाराष्ट्रात ४२६ नव्या माध्यमिक शाळा स्थापन झाल्या.

**शिक्षण दृष्टी नसलेले संस्थापक :–**या काळात स्थापन झालेल्या बहुसंख्य शाळांच्या संस्थापकांची दृष्टी केवळ प्रतिष्ठा संपादनाची होती. त्यांनी स्थापन केलेल्या व्यवस्थापक मंडळावर शिक्षक तर राहोच मुख्याध्यापकहि सदस्य असत नाही. शैक्षणिक दृष्टीच्या अभावाचे व प्रतिष्ठासंपादनाच्या भावनेचे स्पष्ट प्रतिबिंब या शाळांच्या व्यवस्थापनात व दैनंदिन व्यवहारात स्पष्ट दिसते.

**अन्य जुन्या शाळांवर परिणाम:–**प्रतिष्ठेच्या मागे लागून शिक्षण संस्था स्थापणाऱ्या संस्थापकांनी आपल्या शाळेत पुरेसे विद्यार्थी आणण्याकरता अनेक प्रलोभने व प्रकार निर्मिले. विद्यार्थी आणण्याकरता कमिशन, पुरेसे विद्यार्थी आणल्यास नौकरी, प्राथमिक शाळेच्या मुख्याध्यापकास मुलांची स्कूल सर्टिफिकेटस् परस्पर देण्याबाबत बक्षिसी, हे त्यातील काही प्रकार होत. आलेले विद्यार्थी टिकविण्याकरता परीक्षांचे निकाल 'उदारपणे' लावणे हा त्यातील सर्रास अवलंबिला जाणारा प्रकार होय. यामुळे जुन्या शाळांसमोर जीवनमरणाचा प्रश्न उभा राहिला. त्यांनीहि जीवंत राहण्याकरता याच मार्गाचा अवलंब सुरू केला. याचा परिणाम म्हणजे नव्या शाळाबरोबर जुन्याहि शाळांच्या व्यवस्थापनाचा व म्हणून त्यातील शिक्षणाचा दर्जा घसरला.

**खाजगी व्यवस्थापनाचे प्रयोजन संपले:–**परकीय सरकारची शिक्षणाबाबतची उदासीनता व हिंदविरोधी नीती यांचा प्रतिकार करण्याकरता निर्माण झालेल्या खाजगी संस्थापन–व्यवस्थापनाचे कार्य भारताला स्वातंत्र्य मिळाल्यानंतर संपले. कारण त्यानंतर राष्ट्रसंजीवन व राष्ट्रसमृद्धिचे शिक्षण हे एक अमोघ साधन आहे असे मानणारे आपले स्वतःचे सरकार स्थानापन्न झाले. या

दृष्टीने तसेच स्वतंत्र भारताच्या नव्या ध्येय धोरणास अनुसरून नव्या शिक्षण-उद्दिष्टांना पोषक असा शिक्षणसंस्थांच्या व्यवस्थापनात बदल करणे अवश्य झाले. स्वातंत्र्योत्तर काळाची ती ऐतिहासिक गरज होती. पण शासनाने व समाजाने वेळीच या गरजेकडे लक्ष दिले नाही, म्हणून खाजगी व्यवस्थापन चालू राहिले, नव्हे वाढले.

**खाजगी व्यवस्थापनाचा कारभार सुधारण्याऐवजी घसरला:**–खाजगी व्यवस्थापनानेहि नव्या परिस्थितीस, नव्या उद्दिष्टास पोषक असा शिक्षणसंस्थाचा कारभार सुरू केला नाही. उलट या संक्षिप्त इतिहासात दाखविल्याप्रमाणे व्यवस्थापनांच्या घसरत्या प्रेरणांमुळे व शिक्षणसंस्थेच्या गैरकारभारामुळे शिक्षण-दर्जाने इतकी निम्न पातळी गाठली की शिक्षणसंस्थात नवीन उद्दिष्टांप्रत जाण्याची क्षमता तर राहोच, साधे शिक्षण होणेहि अशक्य झाले. अशा प्रकारे शिक्षणसंस्थांचा आजचा कारभार शिक्षणाच्या विकासास पोषक तर नव्हेच बाधक ठरला आहे. कसा ते आपण पुढील प्रकरणात पाहू.

# २

# खाजगी व्यवस्थापन शिक्षण विकासास बाधक

शिक्षणपद्धतीची यशस्विता प्रमुखत: शिक्षकाच्या व शासनाच्या कार्यक्षमते-वर अवलंबून असते. आजच्या खाजगी व्यवस्थापनाने या दोहोंना दुबळे पांगळे करून ठेवले आहे. एवढेच नव्हे तर शिक्षण संस्थांत वर्ग, धर्म, जाति व राजकीय पक्षभेद घुसवून व वाढवून भारतीय शिक्षण विकास निकोपपणे होण्यास ते बाधक ठरत आहे.

## शिक्षकाचे दैन्य, दुरवस्था व पिळवणूक

(१) **पगाराची अनियमितता:**–महिनाभर केलेल्या कामाबद्दल त्या महि-न्याचे वेतन एका निश्चित तारखेस मिळणे ही कोणाच्याहि सेवाशर्तीसंबंधी किमान बाब आहे. भारतातील व महाराष्ट्रातील निमसरकारी व खाजगी शाळातील शिक्षक हा एकच सेवक असा आहे की ज्याचे बाबत ही किमान बाबहि पाळली जात नाही. या शाळातील शिक्षकांचा जीव पगाराच्या अनियमिततेमुळे सदाच टांगणीला लागलेला असतो. ज्या नव्या अनुदानसूत्रामुळे व्यवस्थापकांची

वेळेवर पगार देण्याची असमर्थता स्पष्टपणे प्रगट झाली, ते अनुदानसूत्र जाहीर होण्यापूर्वीच्या वर्षात ही असमर्थता किती शाळांबावत पराकोटीला पोहोचली होती याचा अधिकृत पुरावा विधान परिषदेच्या प्रश्न क्रमांक १२४ च्या (१९६७) उत्तरावरून मिळतो. १९६६–६७ साली इ. बी. सी. व बी. सी. अनुदान आल्यावरच ज्या शाळातील शिक्षकांचे पगार होऊ शकत अशा शाळांची संख्या १६८८ होती. या संख्येत नासिक, धुळे व सोलापूर या जिल्ह्यांतील शाळांचा आकडा सरकारला न मिळाल्यामुळे समाविष्ट नाही. तो समाविष्ट केला तर ही संख्या सहजी २००० होईल. नवे अनुदान सूत्र येण्यापूर्वीच महाराष्ट्रातील खाजगी शाळांपैकी ३/४ शाळांचे व्यवस्थापन ठरीव वेळी पगार देण्यास असमर्थ ठरले होते हे यावरून स्पष्ट होते. महाराष्ट्रातील निम्यापेक्षा अधिक माध्यमिक शिक्षकांना कसे अस्वस्थ जीवन कंठावे लागते याचा हा अधिकृत पुरावा आहे.

**लाचारीचे जिणे**–पण नियमित पगाराचे अभावी शिक्षकाला ज्या प्रकारचे लाचारीचे जिणे जगावे लागते ते यापेक्षा भयंकर उद्वेगजनक आहे.

जी व्यवस्थापने पगार वेळेवर देऊ शकत नाहीत ती जेव्हा केव्हा देतात तेव्हा हप्त्याहप्त्याने देतात. त्यामुळे शिक्षकाला पगार मिळाला म्हटले की सर्वच घेणेकरी त्याचे दाराशी येतात. अर्धवट पगार मिळाल्यामुळे त्यांची समजूत काढता काढता शिक्षकाला जीव नकोसा होतो. पैशाभावी फार चटके लागू लागले म्हणजे शिक्षक थकित पगाराचा हिस्सा भागतो. तो त्याला 'अॅडव्हान्स' म्हणून दिला जातो. व्यवस्थापकांपैकी कोणाचे दुकान असल्यास, 'आपल्या दुकानावरून माल घेऊन जा' असे शिक्षकांना सांगण्यात येते. पगाराच्या अनियमितपणाच्या दु:खावर अशा अनेक प्रसंगांनी डागण्या मिळतात व त्या शिक्षकाला निमूटपणे भोगाव्या लागतात.

शिक्षकाला हे दु:ख केलेल्या कामाचे वेतन ठरीव दिवशी मिळण्याची किमान बाब त्याचे बाबत महाराष्ट्रात आज १९६८ साली संभाळली जात नाही म्हणून भोगावे लागते.

या परिस्थितीत शिक्षकाकडून कोणत्या कार्यक्षमतेची अपेक्षा करावी ?

**व्यवस्थापकांतील भांडणे व अन्य कामांकडे खर्च**–कित्येक वेळा कित्येक शिक्षकांना अनेक महिने पगार न मिळण्याचे कारण व्यवस्थापकमंडळांतील गटागटाची भांडणे हे होय. या भांडणामुळे शाळेचा व्यवस्थापक कोण हे चॅरिटी कमिशनरचे न्यायालयाने व त्यानंतर दिवाणी न्यायालय ठरविते. दरम्यान

शिक्षणाधिकारी कोणालाच अनुदानाची रकम देऊ शकत नाहीत. दोन विरूद्ध पक्ष इरेला पेटलेले असतात. शिक्षकांना पगार न मिळाले तरी त्यांचे काही अडत नसते म्हणून दोन्ही प्रतिपक्षी अनुदान रकम सोडवून शिक्षकांना पगार देण्यास तयार होत नाहीत. व्यवस्थापकांच्या या वृत्तीमुळे शिक्षकावर अनेक दिवस/महिने पगाराविना राहण्याचा प्रसंग येतो.

अनुदान रकमेचा विनियोग सर्वप्रथम पगार देण्याकरता केला पाहिजे हा अनुदानसंहितेतील नियम व्यवस्थापक पाळत नाहीत. तो पैसा अन्य कामी, जुने कर्ज परत करण्यास वा खाजगी खर्चाकरताहि अनेक व्यवस्थापक वापरतात. म्हणूनहि शिक्षकांना पगाराविना राहावे लागते.

(२) **कागदी व नगदी पगारात तफावत** :–विद्यार्थ्यांची संख्या कमी असते व एकूण उत्पन्न कमी म्हणून ही तफावत ठेवली जाते. जास्त रकमेवर सही घेऊन कमी रकम दिली जाते. तफावत रकमेइतकी पावती कोणाच्या तरी नावे दिली जाते हा यातील सर्वात मोठा 'प्रामाणिकपणा' मानला जाईल. तफावत ठेवण्याचा अप्रामाणिकपणा 'थोर' लब्ध प्रतिष्ठित संस्थाचालक करतात. गावात विशिष्ट ज्ञाति–जातिच्या बांधवाकरता शाळा, किंवा जातीच्या हाती शाळा आहे म्हणून त्याग करा अशी या तफावतीला त्यागाची झिलई लावण्यात येते. शाळेसाठी त्याग हा अन्य प्रकार असतो. तो करवून घेण्याकरता आमिष, दडपण, जरब व जबरदस्ती या सर्व साधनांचा उपयोग केला जातो.

**तफावत कोण करतो ?**:–फक्त सर्व सामान्य शाळा चालकच असे करतो असे मानण्याचे कारण नाही. अनेक क्षेत्रातील गण्यमान्य व्यक्ति, पुढारी–प्रत्यक्ष शिक्षण क्षेत्रातील पुरस्कारप्राप्त शिक्षक, संत, महंत, महर्षि म्हणून ज्यांना गौरविले जाते त्यांच्याहि व्यवस्थापनात हे चालते.

**तफावतीच्या रकमेचा उपयोग** :–तफावतीच्या रकमेचा उपयोग शाळेच्याच कामाकरता केला जातो असे मानले जाते पण हे पूर्ण सत्य नव्हे. अनेक व्यवस्थापक त्या रकमेचा उपयोग खाजगीकडेहि करतात. त्यांनी शाळा काढणे व चालविणे हा केवळ प्रतिष्ठेचाच नव्हे तर पैसा मिळविण्याचा धंदाहि करून ठेवला आहे.

या सर्व प्रकारात शासनाला फसविले जाते, हे स्पष्टच आहे.

**ग्रासलेले शिक्षकजीवन**:–उपरोक्त तफावत किती शाळात कशा प्रकारे ठेवली जाते याचे अधिकृत आकडे उपलब्ध नाहीत पण उत्पन्न तर कमी व

शाळा तर चालते अशा सर्व शाळात हा प्रकार घडणे शक्य आहे असे मानले तर विश्वासार्ह अंदाजित पुरावा पुढीलप्रमाणे देता येईल.

जुलै १९६६ मध्ये महाराष्ट्रात एकूण ४०२९ माध्यमिक शाळा होत्या. त्यापैकी ११६८ शाळात (म्हणजे जवळ जवळ ¼ शाळात) प्रत्येकी १०० पेक्षा कमी विद्यार्थी होते. २४० पेक्षा कमी विद्यार्थी असलेल्या एकूण शाळा २४७३ होत्या. ज्या शाळात १००।२०० विद्यार्थी नाहीत त्या शाळेत फीचे उत्पन्न किती असेल याची कल्पना सहज करता येईल. व्यवस्थापन खर्च व उत्पन्नातील ही तफावत शिक्षकाच्या कागदी व नगदी पगारात तफावत करून भरून काढीत असेल असा विश्वास करणे शक्य होईल. या आकडयावरून किती हजार शाळातील शिक्षकांचे जीवन कागदी नगदी पगारातील तफावतीने ग्रासलेले असेल याची कल्पना करता येईल.

**शिक्षकत्वहीन शिक्षकाची निवड:**–शाळासंस्थापकांना आपण शिक्षकांना पूर्ण पगार देऊ शकणार नाही याची जाणीव प्रथमपासून असते. ते शिक्षकाला पहिल्याच मुलाखतीचे वेळी नगदी कागदी पगारात तफावत राखण्यास कबूल आहात का ? असे विचारतात. जे होकार देतील त्यांनाच निवडतात व नेमतात. अशा प्रकारे खऱ्या शिक्षकत्वाची प्रथम होळी करूनच शिक्षकाच्या शिक्षक जीवनास सुरवात होते.

**अन्य अनैतिक प्रकार:**–विनावेतन उमेदवारी, न मिळालेल्या सुटीच्या पगारावर सही, नेमणूक पत्र मिळण्यापूर्वी बिना तारखेचा राजिनामा, सरकारी नियमात न बसणाऱ्या पण विद्यार्थ्यांकडून वसूल केल्या जाणाऱ्या निधी /फी पावतीवर सही आदि अनेक अनैतिक गोष्टी गरजू शिक्षकाकडून करून घेण्यात येतात.

**काळा बाजार:**–शिक्षण व्यवस्थापनातील हा काळा बाजार गेली काही वर्षे तेजाळला आहे व त्या प्रमाणात शिक्षक जीवन काळवंडले आहे.

**मांगल्याचा शब्द उचारणे कठीण:**–श्रेष्ठ आचारविचारांच्या शीलसंपन्न माणसांच्या संख्येवर राष्ट्राची ऊंची मोजली जाते. अशी माणसे घडविणे हे शाळांचे व शिक्षणसंस्थांचे कार्य होय. याकरता आवश्यक ते उदात्त वातावरण निर्मिण्याची मा. शिक्षणमंत्री श्री मधुकरराव चौधरी यांची आकांक्षा आहे. आजच्या सर्वसाधारण खाजगी व्यवस्थापनात वरील अनैतिक प्रकार व अन्य गैरकारभार इतक्या विस्तृत प्रमाणावर चालू आहेत की त्यांचे मूलत: निर्मूलन

झाल्याशिवाय साधे शैक्षणिक वातावरणहि शाळातून निर्माण होणे कठीण आहे; मांगल्याचा तर उच्चारच करणे अशक्य आहे.

**मूलभूत उपायांची आवश्यकताः**–हे कार्य व्यवस्थापनावर निर्बंध घालून होणार नाही. ज्या स्वार्थी व प्रतिष्ठासाधनाच्या प्रेरणांनी आजचे खाजगी व्यवस्थापन कार्य करीत आहे त्या प्रेरणा ओळखून मूलभूत स्वरूपाची प्रभावी उपाययोजना करणे अवश्य आहे.

**(३) शाळांची बेसुमार वाढ, कारणे व परिणामः**–गेल्या १०–१५ वर्षात व विशेषतः महाराष्ट्रात इ. बी. सी. योजना कार्यान्वित झाल्यापासून शिक्षणसेवा करण्यास अनेक सेवक पुढे सरसावले. या 'सेवकां'मध्ये माजी, आजी व भावी जिल्हा परिषद सदस्यांचा, आमदारांचा व खासदारांचा फार मोठा भरणा आहे, असे आपणास दिसून येते. जनतेमध्ये वाढलेली शिक्षण घेण्याची इच्छा व सरकारची फार मोठ्या प्रमाणात मदत देण्याची तयारी या दोहोंचा भरपूर लाभ या मंडळींनी घेतला व स्वतःकरता प्रतिष्ठेचे स्थान कमाविले. यांना शिक्षणाची खरी रुचि असती तर शाळा कोठे काढावी याचे शिक्षणपाहणीचे संकेत पाळण्याची दक्षता त्यांनी बाळगली असती व शाळेच्या नावाचा बोर्ड, कसली तरी कोठे तरी विद्यार्थ्यांना बसायला जागा, चार बाके, जेमतेम टेबल, खुर्ची व मिळेल त्या शैक्षणिक दर्जाचा शिक्षक, एवढ्या भांडवलाचे आधारे सरकारी परवानगी, मान्यता व अनुदान मिळविण्याचे जारीचे प्रयत्न त्यांनी केले नसते. पाहणीचे संकेत मोडण्याच्या त्यांच्या यशस्वी प्रयत्नामुळे शाळांची गेल्या सहा वर्षात कशी एकदम वाढ झाली हे खालील कोष्टकावरून दिसून येईल.

**६ वर्षातील माध्यमिक शाळांची वाढ**

| सन | शाळासंख्या |
|---|---|
| १९५९–६० | २११० |
| १९६०–६१ | २४६८ |
| १९६१–६२ | २९०१ |
| १९६२–६३ | ३१७९ |
| १९६३–६४ | ३३९५ |
| १९६४–६५ | ३६९६ |
| १९६५–६६ | ४०३२ |

**अनियंत्रित वाढः**-शाळांची स्थापना व वाढ विशिष्ट योजनेनुसार व्हावी, पण अशी कोणतीहि योजना शाळा स्थापण्यात टिकली नाही. त्याचा परिणाम म्हणजे १९६६ साली ज्या शाळात अति अल्प विद्यार्थी होते अशा शेकडो शाळा होत्या. विद्यार्थी-संख्येनुसार शाळांच्या केलेल्या खालील वर्गवारीवरून अशा शाळांचे प्रमाण स्पष्ट होईल.

### माध्यमिक शाळांची विद्यार्थीसंख्येनुसार वर्गवारी

| विद्यार्थी संख्येनुसार गट | शाळांची संख्या | एकूण शाळांची टक्केवारी |
|---|---|---|
| १०० पेक्षा कमी | ११६८ | ३२·२६ |
| १०० ते १२० | २४७ | ६·८२ |
| १२१ ते १४० | २४४ | ६·७४ |
| १४१ ते १६० | २२५ | ६·२१ |
| १६१ ते १८० | १८९ | ५·२२ |
| १८१ ते २०० | १४५ | ४·०० |
| २०१ ते २४० | २५५ | ७·०० |
| २४१ ते २८० | १६५ | ४·५६ |
| २८१ ते ३२० | १६२ | ४·५० |
| ३२१ ते ३६० | १२१ | ३·३४ |
| ३६१ ते ४०० | ९६ | २·६५ |
| ४०१ ते ४४० | ९० | २·४८ |
| ४४१ ते ४८० | ६६ | १·८२ |
| ४८१ ते ५२० | ७९ | २·१८ |
| ५२० पेक्षा अधिक | ३६८ | १०·१७ |

**कर दात्याच्या पैशाचा अमाप अपव्यय:**–१९६५ मधील ३६२० माध्यमिक शाळापैकी ११६८ शाळात म्हणजे जवळ जवळ $\frac{१}{३}$ शाळात प्रत्येकी १०० हि विद्यार्थी नव्हते. यावरून शाळांची किती अनियंत्रित वाढ झाली हे समजते. माध्यमिक शाळा नीट चालवायची तर किमान २४० विद्यार्थी असावेत असे मानले जाते. २४० हि विद्यार्थी नव्हते अशा शाळा २४७३ म्हणजे $\frac{२}{३}$ होत्या. यावरून या शाळावर कर दात्याच्या किती पैशाचा अपव्यय होत असेल त्याची कल्पना करता येते.

नवीन अनुदानसूत्रानुसार शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांचा १०० टक्के खर्च सरकार देणार आहे. शेकडो शाळात वर्गात पुरेसे विद्यार्थी नसले तरी शिक्षक असणारच. अशा सर्व शिक्षकांचा खर्च यापुढे सरकारला करावा लागणार आहे.

विकसनशील देशात शिक्षणप्रसाराचे महत्व यत्किंचितहि कमी न लेखता असे म्हणता येईल की हाताशी असलेले द्रव्यबळ, मनुष्यबळ व साधनसामग्री यांचा यापेक्षा अधिक काटकसरीने व कार्यक्षमतेने उपयोग करणे अवश्य आहे.

**अनियंत्रित वाढीचे अन्य दुष्परिणाम:**–(अ) अनियमित पगार, कागदी–नगदी पगारातील तफावत व उपरोक्त अनैतिक प्रकारास बळी पडल्यामुळे व्यवसायाच्या उंबरठ्याशीच शिक्षकत्त्वाची होळी झालेला शिक्षक, शाळांच्या अनियंत्रित वाढीचे हे पहिले परिणाम होत.

(ब) **मुख्याध्यापक निवड:**–व्यवस्थापकाच्या हाती असेल तो आप्त, सगासोयरा वा गावकरी नव्या शाळेचा मुख्याध्यापक असतो. शैक्षणिक नेतृत्त्व करण्याकरता त्याची निवड झालेली नसते. इतर शिक्षकांप्रमाणे वर्गात माणूस उभा करण्याची गरज भागवण्याकरता झालेली असते.

या दोन्ही बाबींचे शिक्षणाच्या दर्जावर फार अनिष्ट परिणाम झाले आहेत.

(४) **शिक्षणाधिकाऱ्यांचे नैतिक धैर्य पिचले:**–खाजगी व्यवस्थापनात समाजातील जनसेवक, पुढारी, आमदार खासदार, असल्याचा एक विपरीत परिणाम म्हणजे शाळाव्यवस्थापनाचे नियम व्यवस्थापकांकडून पाळवून घेण्याची सरकारची अक्षमता. शाळांचे व्यवस्थापन सुव्यवस्थितपणे व्हावे म्हणून सरकारने अनुदानसंहिता तयार केली. त्यातील नियमांचे पालन करवून घेण्याची जबाबदारी शिक्षणाधिकाऱ्यांवर असते. आपल्या अविकसित राजकीय लोकशाहीत अधिकारी वर्गाची जबाबदारी व स्थान याची यथातथ्य कल्पना राजकीय नेत्यांना अजून नाही. 'तुम्ही सरकारी मान्यता न दिलीत तर वरतून ती आणल्याशिवाय राहणार नाही,' ही खाजगी शाळा–संस्थापकाने सरकारी अधिकाऱ्याला दिलेली धमकी त्यांनी खरी करून दाखविल्याची उदाहरणे थोडी थोडकी नाहीत. तसेच कोणत्याहि आमदाराने वा प्रतिष्ठित शाळाव्यवस्थापकाने जमेल त्या स्तरावर दडपण आणून अनुदानसंहितेच्या नियमांची अंमलबजावणी स्थगित करविल्याचीं वा सतत उद्यावर टाकविल्याची उदाहरणे नेहमी घडत आहेत. शिक्षणमंत्र्याशिवाय अन्य मंत्र्याने शिक्षणाधिकाऱ्याशी संपर्क साधून त्याचेवर दडपण आणणें अयोग्य मानले जावे, पण तसे मानले जात नाही. यामुळे अधिकारीवर्गाचे नैतिक धैर्य पिचले गेले आहे.

**खुद्द शासन लुळे पडले :**–आज तर खाजगी व्यवस्थापनापुढे खुद्द शासनहि लुळे पांगळे झाले आहे. शासनाचे हुकुम मानण्यास व्यवस्थापनाने दिरंगाई केल्याची शेकडो उदाहरणे सरकारदप्तरी आहेत पण प्रत्यक्ष शासनाच्या साध्या चौकशी प्रश्नाला दोन ओळीचे साधे उत्तरहि कित्येक व्यवस्थापक पाठवीत नाहीत. अशी

शासनाची परिस्थिती खाजगी व्यवस्थापकांनी केली आहे. याचे ताजे उदाहरण दिल्यास सरकारच्या या परिस्थितीवर लख्ख प्रकाश पडेल.

**निम्म्या शाळा शासन प्रश्नाला केवळ उत्तरसुद्धा पाठवत नाहीत !! :–** विधानमंडळाकडून आलेल्या प्रश्नाला शासन नेहमीच अत्युच्च महत्त्व देते. विशिष्ट मुदतीत ते आलेच पाहिजे अशी विधानमंडळाची शासनावर जरब असते. ही जाणून सर्व अधिकारी वागत असतात. विधानपरिषदेच्या गेल्या अधिवेशनाकरता सदस्य श्री ओगले यांनी 'पुणे जिल्ह्यातील एकूण किती शाळांनी आपल्या शिक्षकांना ३१ ऑगस्ट १९६७ अखेर असलेली पगार व भत्ते यांची संपूर्ण रक्कम ३० सप्टेंबर ६७ पर्यंत दिली नव्हती ?' असा मुख्य व अन्य उपप्रश्न विचारले. खुद्द पुण्यासारख्या जिल्ह्यातील २४५ शाळांपैकी १२४ शाळांनी या प्रश्नाचे उत्तर सरकारकडे मुळी शेवटपर्यंत पाठविलेच नाही. सरकारने या बाबत म्हटले आहे, **'सर्व प्रयत्न करूनहि'** फक्त १२१ शाळांकडील माहिती आली !

रकम दिली किंवा नाही एवढ्या एका साध्या प्रश्नाचे एक किंवा दोन शब्दांचे उत्तर शासनाला पुणे जिल्ह्यातील १२४ शाळा व्यवस्थापक पाठवीत नाहीत !! व्यवस्थापकांनी सरकार लुळे पांगळे केले हे सिद्ध करण्यास हे उदाहरण पुरेसे नाही असे कोण म्हणेल ?

**शासनाला फसविण्याचे अनेक प्रकार :–**सरकारी नियमाविरूद्ध विद्यार्थ्यांकडून अनेक नावांनी 'निधि' वसूल करणे, इ. बी. सी विद्यार्थ्यांकडून सुद्धा दरमहा ८ आणे वा एक रुपया वसूल करणे, प्रवेशाकरता खुषीच्या देणग्या सक्तीने घेणे, एकाच संस्थेच्या अनेक शाळा असल्यामुळे तीच ती पुस्तके व प्रयोगशाळा उपकरणे इन्सपेक्शनच्या दिवशी त्या त्या शाळेत नेऊन प्रत्येक शाळेत स्वतंत्र ग्रंथालय व प्रयोगशाळा आहे, अशी बतावणी करणे, एकाच इमारतीत प्राथमिक, माध्यमिक शाळा, प्रशिक्षण महाविद्यालय आदि चालविणे व त्याच इमारतीचे दुप्पट भाडे कमाविणे, शाळा इमारतीची किंमत फुगविणे, फुगविलेल्या किंमतीवर जास्त भाडे मिळविण्याकरता अभियंत्याची सर्टिफिकेटस् मिळविणे, अनुदानाचा पैसा खाजगी खात्यात जमा करणे, खाजगी भांडवल म्हणून काही काळ वापरणे, शाळेचा जमाखर्च व 'संस्थेचा' जमाखर्च असा ठेवणे की ज्यामुळे शाळा सदा ओढघस्तीत आहे व संस्थाच महान लोककार्य करीत आहे असे दिसावे, आजीव सेवकांना शाळा उत्पन्नातून अनेक सवलती देणे, व्यवस्थापकाला 'ऑनररियम' देणे, 'सोसायटी' चा

ग्रंथ शाखा (स्थळ

जमाखर्च म्हणजे सरकारसाठी 'बंद पुस्तक' ठेवणे आदि अनेक प्रकाराने सरकारच्या नियमांची पायमल्ली व सरकारची फसगत खाजगी व्यवस्थापन करीत आहे. माध्यमिक शाळांचा जवळजवळ सर्व आवर्ती खर्च करण्याची जबाबदारी शासनाने घेतल्यावर शासन हे प्रकार असेच चालू देणार आहे का ?

(५) **ज्ञाती–जाती–वर्ग आणि राजकीय पक्षशाळा** :–मिशन शाळा, मुस्लिम शाळा, आपण कोण हे उघड न होऊ देता चालणाऱ्या ब्राह्मण, पाटील, देशमुख, लिंगायत, तेली, माळी, बारी अशा ज्ञाती जातीच्या शाळा समाजातील भेदाभेद वाढता राहील याची खबरदारी गुप्तपणे घेत आहेत.

कमी अधिक फी देऊ शकणाऱ्या पालकांच्या मुलाकरता निराळ्या शाळा, व इबीसी मुलांकरता निराळ्या शाळा श्रीमंत–गरीब भेद व परस्पराकडें पाहण्याची उच्च–निम्न दृष्टी वाढवीत आहेत.

भारताने लोकशाही मार्ग स्वीकारल्यानंतर राजकीय पक्षांनी शाळा व महाविद्यालये आपल्या राजकीय पक्ष शिकवणुकीची व प्रसंगी राजकारणांची केंद्रे बनविली आहेत. कांग्रेस, जनसंघ, रा. स्वयंसेवक संघ, समाजवादी व कम्युनिस्ट विचारसरणीच्या नागरिकांनी काढलेल्या व चालविलेल्या शाळा आहेत. या शाळात त्याच विचारसरणीच्या शिक्षकांच्या नेमणुका होतात हे उघड सत्य आहे. सर्व मोठ्या व नेतृत्त्व करणाऱ्या शहरातील विभिन्न शाळातही परिस्थिती आहे. कोणत्या महापुरूषाचे उत्सव, जयंत्या या शाळा साजऱ्या करतात, त्या वेळी काय भाषणे होतात, हे तपासून पाहिले म्हणजे ही परिस्थिती सहज लक्षात येईल. अनेक शाळातून भिन्नभिन्न आर्थिक, सामाजिक, राजकीय तत्त्वज्ञाने पसरविण्याचा व ठसविण्याचा प्रयत्न होत आहे. या परिस्थितीमुळे शिक्षणाच्या, विशेषतः माध्यमिक शिक्षणाच्या, गाभ्यालाच कीड लागली आहे. ही कीड शिक्षणाचा वृक्ष पोखरून काढीत आहे.

**अविश्वासार्ह सत्य** :–राजकीय पक्षांचे आपल्या उमेदवारास निवडून आणण्यात यश असते. खाजगी व्यवस्थापक आपल्या हाताखालील शिक्षकांना विशिष्ट उमेदवारास मत देण्यास भाग पाडतो. एवढेच नव्हे तर २१ वर्षांखालील स्त्री-पुरुषांना, बेसिक ट्रेनिंग कॉलेजातील विद्यार्थी विद्यार्थिनींना, मतदार नोंदवितो व आपल्या उमेदवाराच्या यशाची मोर्चेबांध करतो हे अविश्वासार्ह सत्य आहे.

**उशीरा जागृत होणे व्यर्थ** :–यापुढेही खाजगी व्यवस्थापन कायम ठेवल्यास मुळाशीच ज्ञाती जाती राजकीय पक्षोपक्षांचे खतपाणी घालणे कायम राहील व

त्यातून विषवृक्ष फोफावेल. एकात्मतेची मुळे धरणेच अशक्य होईल, मग शिक्षणाची अन्य मधुर फळे या वृक्षास येणेच अशक्य.

भारतातील सर्वच पक्षोपक्षांनी आजपर्यंत आपल्या अंतर्गत व्यवहारात-पदाधिकारी निवडणे-आमदार खासदार पदासाठी तिकिटे देणे याबाबत-जाती ज्ञाती, भाषा आदि बाबींचा विचार केला. राष्ट्रात त्याच वृत्तीचा आता डोंब उसळला आहे.तेव्हा आता ज्ञाती-जाती-भाषा वाद निंद्य आहे म्हणून पश्चाताप दर्शविला जात आहे. शिक्षणाच्या मुळाशी आज याच भेदाभेदांचे खतपाणी दिले जात आहे. खाजगी व्यवस्थापन कायम राहील तोपर्यंत उघड वा गुप्तपणे ते चालूच राहणार आहे. ते आजच तोडणे अगत्याचे आहे, याची जाणीव सर्व राष्ट्रप्रेमी नागरिकांनी आजच करून घेणे अवश्य आहे.

ज्यांनी खाजगी व्यवस्थापनाचे आधारे प्रतिष्ठा मिळविली ते व त्यापैकी ज्यांचे जीवनच खाजगी शिक्षणसंस्थांच्या अस्तित्वावर अवलंबून आहे ते, खाजगी व्यवस्थापन नष्ट करण्याच्या विचारावर सर्व सामर्थ्यानिशी तुटून पडतील हे उघड आहे. ते करण्यापूर्वी खुद्द त्यांनी व इतर सर्व सुबुद्ध नागरिकांनी या प्रश्नाचा-खाजगी व्यवस्थापनाचे भावी शैक्षणिक विकासात स्थान कोणते-याचा मूलगामी विचार राष्ट्रीय हितबुद्धीने करणे अगत्याचे नाही काय ?

## ३

## शिक्षण आयोग व खाजगी व्यवस्थापन

मागील प्रकरणात खाजगी व्यवस्थापनात आढळत असलेल्या ठळक दोषांचे व परिणामांचे स्वरूप आम्ही पुढे मांडले आहे. भारतीय शिक्षण आयोगाचे (१९६४-६६) या बाबतीत काय म्हणणे आहे ते या प्रकरणात आम्ही पुढे मांडणार असून, खाजगी व्यवस्थापनातील दोष दूर करण्यासाठी व शैक्षणिक उद्दिष्टे साध्य करण्यासाठी आयोगाने सुचविलेले उपाय व त्यांची उपयुक्तता वा अपुरेपणा यांचा विचार पुढील प्रकरणात करावयाचा आहे.

**एकात्मतेला विघातक:**-राष्ट्रीय एकात्मतेचे पोषण करण्याऐवजी कित्येक खाजगी शिक्षणसंस्थांत जातीयतेला प्रोत्साहन दिले जात आहे, (१·१८) या वाक्याने शिक्षण आयोगाने खाजगी व्यवस्थापनावर पहिला आघात केला आहे.

'भारतात शिक्षणाचे कार्य एकात्म समाज निर्माण करण्याचे आहे पण सध्याची शिक्षणपद्धति–फी देणारी मुले एका संस्थेत, न देणारी मुले दुसऱ्या संस्थेत आदि प्रकारे, समाजात वर्गभेद वाढवीत आहे (१·३६). 'अधिक वाईट म्हणजे हा अलगपणा उच्च वर्ग व जनता यामधील दरी रुदावीत आहे.' (१·३६) 'अशा प्रकारच्या पद्धतीला काहीहि इतिहास असला तरी जी लोकशाही व समाजवादी समाजरचना निर्माण करण्याची आपली इच्छा आहे, त्या रचनेत या पद्धतीला मुळीच स्थान नाही.' (१·३८) असे शिक्षण आयोगाचे म्हणणे आहे.

**अध्यापक नेमणुकांचे मागे जातीयवृत्ती ?**:–खाजगी शाळा व महाविद्यालये यातील अध्यापकांच्या नेमणुका गुणवत्तेच्या आधारावर बहुधा होत नाहीत असे आयोगाला आढळून आले आहे. असे का ? याचे कारण काही बाबतीत ती संस्था उघडपणे न बोलता वा तसे स्पष्ट न दिसू देता ज्ञातिसंस्था (denominational) असते. काही वेळा संस्थेच्या नियामक मंडळाने नेमणुकाबावत केलेला अधिकाराचा तो गैरवापर असतो तर कधी बाहेरील दडपणामुळे अशा नेमणुका घडतात (३·१३·३.इ.) असे आयोगाचे निदान आहे

**शिक्षकांना सेवा शाश्वती नाही**:–खाजगी शाळातील शिक्षकांच्या सेवाशर्तीबाबत 'अनेक व्यवस्थापकांनी योग्य सेवाशर्ती मुळी ठरविल्याच नाहीत. आणि बऱ्याच वेळी पुरेसे कारण नसता, न्याय अन्यायाचा विचार न करता शिक्षकांना नौकरीवरून काढून टाकण्यात येते,' असे आयोगाचे यापुढील निरीक्षण आहे. (३·३५)

**अपात्र शिक्षण संस्थांची बेसुमार वाढ : शिक्षणाची शोकांतिका**:–'शिक्षणाची वाढती मागणी पुरविताना साधनसंपत्तीचा अपुरेपणा फारच जाणवतो. आपल्यासारख्या विकसनशील देशात तर तो अधिकच जाणवतो. पुष्कळ वेळा शिक्षणाचा व साधनसंपत्तीचा दर्जा घसरवून शिक्षणाची मागणी पुरी करण्यात येते. शिक्षक मिळण्याची शक्यता नसता, अन्य शिक्षण साधने नसता, आवश्यक पैसा नसता, शिक्षणसंस्था स्थापल्याची अनेक उदाहरणे आहेत, असे आयोगाने म्हटले आहे. राष्ट्राच्या भव्य व चिरंतन हिताचे दृष्टीने या सर्व सामान्य झालेल्या पद्धतीला विरोध केलाच पाहिजे. विद्यालयीन व महाविद्यालयीन शिक्षणाची मागणी पुरी करणे जर एखाद्या समाजास अशक्य होत असेल तर ती खरोखरीच दुर्दैवाची गोष्ट आहे. पण या मर्यादेकडे दुर्लक्ष करून शिक्षणाच्या दर्जाबाबत बेफिकिरी दाखविली तर ते शिक्षणाचे दुर्दैवच नव्हे तर शिक्षणाची

शोकांतिका ठरेल.' (५·१०) इतक्या कडक शब्दात आयोगाने शिक्षणसंस्थांच्या चालू अनियंत्रित वाढीचा निषेध केला आहे.

खाजगी शाळा संस्थापकांनी प्रतिष्ठासाधनापायी शिक्षणाची ही शोकांतिका आज घडविली आहे.

**घातुक स्पर्धा**:–या अनियंत्रित वाढीतून घातुक स्पर्धा जन्माला आली आहे. आपल्या महाराष्ट्र शासनाने शैक्षणिक सर्वेक्षण (एज्युकेशनल सर्व्हे) करून ज्याप्रमाणे माध्यमिक शाळा कोठे स्थापन व्हाव्या याची योजना केली होती तशी पाहणी शाळांच्या योजनाबद्ध विकासासाठी करावी, असे आयोगाने सुचविले आहे. जेथे शाळा नको इतक्या प्रमाणात स्थापन झाल्या असतील व त्यामुळे ज्या शाळांत धातुक स्पर्धा सुरू असेल त्या शाळांचे एकत्रीकरण करण्याची आवश्यकता आयोगाने प्रतिपादन केली आहे. (७·४६·१) किती वर्तुळक्षेत्रात माध्यमिक शाळा असावी तेहि आयोगाने सुचविले आहे. आयोगाने सुचविली तशी पाहणी तयार असताहि खाजगी व्यवस्थापक अनेक प्रकारे दडपणे आणून पाहणीत न दाखविलेल्या जागी सरकार-परवानगीने शाळा सुरू करतात व पाहणी निरुपयोगी ठरवितात, हे सिद्ध झाले आहे. साहजिकच शाळाशाळांत स्वत:चे अस्तित्व टिकविण्यासाठी जीवघेणी स्पर्धा सुरू होते, अनेक अश्लाघ्य मार्गांचा अवलंब केला जातो. स्वप्रतिष्ठेकरता झटणारे व या मार्गांचा अवलंब करणारे संस्थापक–व्यवस्थापक शिक्षणहिताकरता इतकी दडपणे आणून सुरू केलेल्या शाळांचे एकत्रीकरण करू देण्यास संमति देतील, असे का मानावे ?

सहकार्याधिष्ठित निकोप स्पर्धेचे महत्त्व आम्ही समजू शकतो. पण विद्यार्थीसंख्या, शिक्षकमनुष्यबळ, द्रव्यबळ, साधनसामग्री यांचे दुर्भिक्ष असता चालविलेली ही स्पर्धा कोणते शैक्षणिक व सामाजिक हित घडवून आणणार ?

**भ्रष्टाचाराबाबत आयोगाची खातरजमा**:–आर्थिक अडचणीमुळे खाजगी व्यवस्थापन कसे दुबळे झाले आहे व म्हणून कोणत्या प्रकारचा भ्रष्टाचार करते हेहि आयोगाने पुढे मांडले आहे. (१) सरकारी अनुदान मिळण्याची अनिश्चितता व त्या व्यतिरिक्त पैसा जमविता येण्याची असमर्थतता आणि (२) पुष्कळ वेळा वाईट एवढेच नव्हे योग्यायोग्यतेचा मुळीच विचार न करणारे व्यवस्थापन असा खाजगी व्यवस्थापनाचा दुहेरी दुबळेपणा आहे असे आयोगाचे म्हणणे आहे. आयोगाने पुढे जाऊन गुणवत्ता व कार्यक्षमता या दृष्टीने सर्व खाजगी शाळांचे कार्यक्षम शाळांचा लहान गट व दुबळ्या अनिष्ट

२७०५ - २०।३।६७


शाळांचा **मोठा** गट असे दोन गट पाडले आहेत. या **मोठ्या** गटातील शाळांत कागदी व नगदी पगारात तफावत ठेवण्यापर्यंतचे सर्व प्रकार चालतात असे आयोगाने स्पष्ट म्हटले आहे. या शाळा शिक्षणाला व जीवनाला अपायकारक कार्य करतात असे मानलेच पाहिजे असा आयोगाचा अभिप्राय आहे. शालेय शिक्षण क्षेत्रात या शाळा ही फार मोठी समस्या आहे, असे आयोगाचे म्हणणे आहे. (१०·१०)

**आयोगाचा तोडगा**:–वरील दोष दूर करण्याकरता आयोगाने एक तोडगा सुचविला आहे त्याचे स्वरूप व त्यामुळे खाजगी व्यवस्थापनाचा होणारा संकोच याचा आपण विचार करू.

**जिल्हा शिक्षण मंडळ**:–भारतीय शिक्षणाची उद्दिष्टे साध्य करण्याकरता आयोगाने जे मार्ग सांगितले आहेत त्यात समानशाळापद्धतीची निर्मिती हा मुख्य मार्ग सांगितला आहे. समानशाळानिर्मितीच्या मार्गावरील पहिला टप्पा म्हणून 'जिल्हाशिक्षण मंडळाची' रचना करावी असे आयोगाचे म्हणणे आहे. जिल्हा शिक्षण मंडळ सरकारी व निमसरकारी प्राथमिक, माध्यमिक, व्यावसायिक आदि सर्व शाळांचे संपूर्ण व्यवस्थापन करील व 'खाजगी' शाळांना, सरकारी नियमांनुसार जिल्हा शिक्षणअधिकाऱ्यांच्या शिफारशीनुसार अनुदान देईल, असे अधिकार तूर्त जिल्हा शिक्षणमंडळाला असावे अशी आयोगाची शिफारस आहे. या शिफारशीनुसार खाजगी व्यवस्थापन कायम राहते व त्याला अनुदान देण्याची पद्धतहि कायम राहते हे खरे असले तरी त्यामुळे खाजगी व्यवस्थापनाच्या आजच्या अधिकारांवर फार मोठी बंधने येतात हे आपण लक्षात घेतले पाहिजे.

**जिल्हा शिक्षणमंडळाची कार्यपद्धती**:–(१) जिल्हा शिक्षणमंडळावर जे सदस्य राहावयाचे त्यात खाजगी व्यवस्थापनाचे प्रतिनिधी राहणार नाहीत, (१८-१८)

(२) **सरकारी योजनेनुसार** शाळांची स्थापना करणे व वाढविणे हे या **मंडळाचे** कार्य राहील;

म्हणजे व्यवस्थापनाला वा प्रतिष्ठा प्राप्त करण्याची इच्छा करणाराला पाहिजे तेथे शाळा स्थापन करता येणार नाहीत.

(३) पगार, भत्ते सेवाशर्ती, भविष्यनिधी, निवृत्तीवेतन आदि सर्व बाबी सर्वत्र समान राहतील, एवढेच नव्हे तर

(४) शिक्षकांच्या नेमणुका विशिष्ट पद्धतीनुसार एक समिती करील, व्यवस्थापन करणार नाही. या समितीची रचनाहि आयोगाने सुचविली आहे.

(५) माध्यमिक शाळातील फी थोड्याच काळात रद्द होईल. ज्या कार्यक्षम शाळा बीजकेंद्रे म्हणून कायम ठेवल्या जातील, फक्त त्याच शाळांना याबाबत विशेष सवलत असेल.

महाराष्ट्राच्या नव्या अनुदानसूत्रावर जी खाजगी व्यवस्थापने विशेष तुटून पडत आहेत त्यांचेकडे जरा सूक्ष्म व चौकस दृष्टीने पाहिले तर त्या व्यवस्थापनांच्या शाळात फी देणारे विद्यार्थी पुष्कळ व फीचे दरहि साधारण दरापेक्षा अधिक होते व आहेत असे दिसते. तेव्हा माध्यमिक शाळातून फी पूर्णपणे रद्द झाली म्हणजे वरील बंधने स्वीकारून खाजगी व्यवस्थापने शाळा चालविण्यास समर्थ व प्रवृत्त राहणार नाहीत हे स्पष्ट आहे.

**तोडगा तोकडा पडणार:**–खाजगी व्यवस्थापनाची जी स्थिती खुद्द आयोगाने वर्णिली आहे ती पाहता व वरील बंधने स्वीकारून शाळा चालविण्यास खाजगी व्यवस्थापने तयार होणार नाहीत हे पाहता शिक्षण आयोगाने सुचविलेला हा तोडगा ध्येयसिद्धीस अपुरा पडेल. या उपायावर अगदी नजीकच्या भविष्यकाळात फेरविचार करणे आवश्यकच होणार असेल तर आजच तो व्हावा असे आम्हांला वाटते.

शिक्षण आयोगाने शिक्षण विकासाचे काही मार्ग सांगितले आहेत. त्या मार्गांचा अवलंब आपणाला करावा लागणार आहे. तो करावयाचा तर त्या मार्गाने जाण्यास खाजगी व्यवस्थापन सहाय्यक ठरेल की अडसर ठरेल याचा विचार आपण पुढील प्रकरणात करू.

# ४

# शिक्षण आयोग प्रणीत विकासाचे मार्ग व खाजगी व्यवस्थापन

भारताची राष्ट्रीय उद्दिष्टे, नवी अर्थव्यवस्था व समाजव्यवस्था ही सर्व साध्य होण्यासाठी शिक्षण एक प्रभावी साधन म्हणून उपयोगी पडावयाचे असेल तर त्याच्या व्यवस्थापनात, कार्यपद्धतीत व अभ्यासक्रमात काही मूलगामी सुधारणा केल्या पाहिजेत, हे भा. शि. आयोगाचे मत कुणासहि मान्य होईल. आयोगाने अशा दोन प्रकारच्या सुधारणा सुचवल्या आहेत.

(अ) शिक्षण व्यवस्थापनसंचालनात सुधारणा.

(ब) अभ्यासक्रमात सुधारणा.

(१) समान शाळा पद्धती (२) परिसर शाळा व (३) शाळा समूह या तीन सुधारणा शिक्षणसंचालनात पुनर्रचना घडवून आणण्यासाठी आहेत तर (१) माध्यमिक शिक्षणाचे व्यावसायिक शिक्षणांत रूपांतर (२) श्रमानुभव आणि समाजसेवा व (३) सांस्कृतिक–नैतिक मूल्यांची जोपासना ह्या तीन अभ्यास-क्रमाच्या दृष्टीने सुधारणा आहेत. या सुधारणा घडवून आणण्याच्या कामी आजची खाजगी व्यवस्थापन पद्धती उपयोगी पडेल काय की तिचा अडथळाच होईल, याचा विचार या प्रकरणात करू.

**समानशाळा पद्धती :–**या पद्धतीमध्ये शाळात विद्यार्थ्यांना जाती, धर्म, वर्ग सामाजिक दर्जा आदि कोणत्याहि बाबींचा विचार न करता प्रवेश मिळेल; संपत्ति वा सामाजिक दर्जा नव्हे तर बुद्धीमत्तेचे आधारे प्रवेश मिळेल; सर्व शाळांत शिक्षणाचा दर्जा समान राहील व कांही शाळा गुणवत्ता–शाळा राहतील, या शाळात फी मुळीच घेतली जाणार नाही, तसेच या शाळात सर्व-साधारण पालकाच्या शैक्षणिक गरजा इतक्या प्रमाणात भागतील की त्याला या पद्धतीबाहेर असणाऱ्या महागडया शाळात आपल्या मुलाला पाठविण्याची आवश्यकता वाटणार नाही.

शिक्षण आयोगाने समानशाळापद्धतीची आपली कल्पना वरील प्रकारे स्पष्ट केली आहे, (१·३८) आणि अशी पद्धत निर्माण करण्याकडे आपण पावले टाकलीच पाहिजेत असे सांगितले आहे.

समान शाळापद्धती स्वीकारल्यानंतरहि त्या पद्धतीत समाविष्ट न झालेल्या खाजगी शाळा राहणार आहेत. त्यांना अनुदान राहणार नाही तसे फीचेहि बंधनहि राहणार नाही. त्यामुळे त्या महागडया होतील. त्यांचा प्रश्न आपण तूर्त दूर ठेवू.

जिल्हा शिक्षणमंडळाच्या वेळी सांगितलेली बंधने स्वीकारून एक तर खाजगी व्यवस्थापने शाळा चालविण्यास तयार होणार नाहीत. जी तयार होतील त्यापैकी फारच थोडी व्यवस्थापने वरील पद्धती मान्य करतील, हे उघड आहे.

**परिसरशाळा :–**सामाजिक थरातील अलगपणा नष्ट व्हावा म्हणून परि-सरातील सर्व जाती, ज्ञाती धर्म, वर्ग आणि आर्थिक व सामाजिक दर्जाच्या सर्व

मुलांनी परिसरातील शाळेतच जाणे म्हणजे परिसरशाळा अशी परिसर शाळेची कल्पना आयोगाने स्पष्ट केली आहे (१०·१९) परिसरशाळांमुळे सामाजिक व राष्ट्रीय एकात्मता निर्माण होईलच पण या शिवाय

(अ) सर्वसामान्यांच्या जीवनात सहभागी होणे हे 'प्रभावी' शिक्षणाचे अंग असल्यामुळे परिसरशाळात 'चांगले' शिक्षण मिळेल, तसेच

(ब) परिसरशाळांच्या स्थापनेमुळे श्रीमंत लब्ध प्रतिष्ठित व समाजातील सत्तासंपन्न वर्गांना त्या शाळेत रस घेणे भाग पडेल व त्या शाळांची त्यामुळे लवकर उन्नति–प्रगति होईल असे आणखी दोन महत्त्वपूर्ण लाभ होतील असे सांगून आयोगाने या कल्पनेचे आणखी समर्थन केले आहे.

आयोगाने सुचविलेली ही कल्पना एका दृष्टीने समानशाळा पद्धतीच्या कल्पनेपेक्षाही उच्च, धनिक व सामाजिक प्रतिष्ठासंपन्न वर्गाला वस्तुतः अधिक धक्का देणारी आहे. तरीहि संसदेच्या संबंधित समितीने ही कल्पना प्रत्यक्षात तत्काळ अंमलात आणण्यावर भर दिला आहे. (समिती प्रतिवृत्त पृ. २ व २३) मध्यवर्ती शिक्षणसल्लागार मंडळानेहि परिसरशाळा कल्पनेस मान्यता दिली आहे.

या कल्पनेच्या अंमलबजावणीस सुरवात होताच त्या त्या स्थानिक क्षेत्रातील धनिक आपला पाठिंबा व मदतीचा ओघ ज्या शाळांत त्यांची मुले शिकतील त्या शाळांकडे वळवतील; त्यामुळे सर्वसाधारण खाजगी व्यवस्थापन अधिक संकुचित होईल.

**समूहशाळा** :–आज भिन्नभिन्न खाजगी व्यवस्थापनाखालील म्हणून अनेकविध शाळांतील विद्यार्थ्यांना शिक्षण साहित्य व साधने, गुणवत्ता असलेले शिक्षक यांचा लाभ घेण्याची समानसंधि मिळत नाही. ती मिळावी या हेतूने आयोगाने समूहशाळांची उत्कृष्ट कल्पना मांडली आहे. या कल्पनेनुसार एका महाविद्यालयाने काही माध्यामिक शाळा, एका माध्यामिक शाळेने काही उच्च प्राथमिक शाळा व एका उच्च प्राथमिक शाळेने काही निम्न प्राथमिक शाळा 'दत्तक' घ्यावयाच्या आहेत. अशा समूहशाळांमुळे आजच्या शिक्षणपद्धतितील शिक्षणसंस्थातील अलगपणा नष्ट होईल हा फार मोठा शैक्षणिक लाभ होईल. या कल्पनेनुसार उदा. ज्या माध्यमिक शाळेने काही उच्च प्राथमिक शाळा 'दत्तक' घेतल्या असतील ती माध्यमिक शाळा आपले अध्यापननिपुण शिक्षक, कार्यपद्धती, ग्रंथालय, प्रयोग शाळा आदि

साहित्य-साधनांचा लाभ समूहातील शाळांना सहकार्यवृत्तीने करून देईल अशी योजना आहे. भारतातील शिक्षणसाधने व अध्यापननिपुण शिक्षक यांचा तुटवडा पाहता असलेल्या साधनांचा कमाल लाभ अशा प्रकारच्या सहकार्यपद्धतीने शाळांना घेता आला पाहिजे. या साधनांवरील खाजगी मालकी व व्यवस्थापन कायम राहिले तर त्यांचा लाभ योजनापूर्वक अनेक शाळांना देता घेता येईल का ? समूहशाळेची कल्पना कार्यान्वित व विकसित होण्यास मूळ प्रेरणा सहकार्याची हवी. स्वसेवा, स्वप्रतिष्ठा ही मूळ प्रेरणा असलेले खाजगी व्यवस्थापन दूर करून सहकार्याच्या प्रेरणेवर आधारलेले व्यवस्थापन निर्माण केल्याशिवाय समूहशाळा कल्पना यशस्वी होणे संभवत नाही.

**समाजसेवा व श्रमानुभव**:–समाजसेवा व श्रमानुभव ही नव्या शिक्षणपद्धतीची अविभाज्य अंगे असावीत अशी आयोगाची सूचना आहे. शिक्षणाचे एकांगी व पुस्तकी स्वरूप पालटण्यासाठी, सर्व समाजाविषयी आपुलकी निर्माण करण्यासाठी व शिक्षण उत्पादनाभिमुख होण्यासाठी ही सूचना तत्त्वतः सर्वच संबंधितांनी स्वीकारली आहे पण ती अंमलात आणण्याकरता तपशीलाचा विचार होत असता याकरता साहित्य व संधि किती प्रमाणात उपलब्ध करून द्याव्या लागतील व त्यात किती विविध जीवनशाखांतील संघटनाचे साहाय्य घ्यावे लागेल, याचा विचार करता विचारांची गति कुंठित व्हावी इतके ते प्रमाण प्रचंड आहे ! पण ज्यावेळी समाजसेवा व श्रमानुभव शिक्षणाची आवश्यक अंगे बनविण्याचा निर्धार भारत करील त्यावेळी खाजगी संस्थांचे अस्तित्व कार्यवाहीला बाधक ठरणार आहे कारण आवश्यक असलेले सहाकार्य व संधि कोणत्याहि संघटना खाजगी व्यवस्थापनातील शिक्षणसंस्थांना, काही कारणाने विशेष नाते असल्याशिवाय, उपलब्ध करून देणार नाहीत. ज्या देतील व ज्या संस्था ते सहकार्य घेऊ शकतील त्यांची संख्या तर अत्यल्प राहीलच पण शिवाय त्यामागे समाजसेवेची मूळ भावना राहणार नाही, आपल्याशी कमी अधिक संबंध असलेल्या शाळांना मदत द्यावी अशी त्या मागे भावना असेल. जीवनातील एक संघटना भारतीय जीवन विकसित होण्याकरता दुसऱ्या शैक्षणिक संघटनेला जे सहकार्य देईल तेच खरे सहकार्य व त्या मागील वृत्ति हीच खरी समाजसेवेची वृत्ती होय. ती वाढीस लावावयाची असेल तर शिक्षणसंस्थांचे व्यवस्थापन 'खाजगी' ठेवून चालणार नाही.

**माध्यमिक शिक्षणाचे व्यवसायीकरण**:– याही तत्त्वाचा पुरस्कार आयोगाने केला आहे. व्यवसायशिक्षण सर्वसाधारण शिक्षणाचाच एक अविभाज्य अंश

असावा असा त्याचा अर्थ आयोगाने पहिल्या प्रकरणात केला आहे. पण पुढे माध्यमिक शिक्षण घेण्याचे वय असताच व्यवसाय शिक्षण देणे व तशा सोई उपलब्ध करून देणे असा केला आहे. या मर्यादित अर्थाने सुद्धा जर अनेकविध शाळा व्यवसायशाळा करावयाच्या असतील तर खाजगी व्यवस्थापन त्या करू शकत नसल्यामुळेहि खाजगी व्यवस्थापनाला भविष्यात स्थान अगण्यच राहणार आहे. आजहि खाजगी व्यवस्थापन व्यवसायशाळा क्वचितच चालविते. आयोग प्रतिवृत्तात पहिल्या प्रकारणात दिलेल्या खऱ्या अर्थाने माध्यमिक शाळांचे व्यवसायीकरण करावयाचे म्हटले तर खाजगी व्यवस्थापनाला ते अशक्यच आहे. आजहि बौद्धिक अभ्यासक्रमाला ज्या पर्यायी वा जोडीने व्यावसायिक-विषय घेण्याची सोय आहे त्याबाबत खाजगी व्यवस्थापक उदासीन आहेत, हे सर्वपरिचित आहेच.

**सांस्कृतिक व नैतिक मूल्यांचे सवर्धन**.–शिक्षणक्षेत्रात नैतिक मूल्यांचे संवर्धन झालेच पाहिजे हे सर्वांना मान्य आहेच. सध्या भारताच्या विविध जीवनक्षेत्रात या मूल्यांचा जो धुव्वा उडाला आहे त्याकडे पाहून–नेहमीच्या ठोकळेबाज विचार पद्धतीतून–शिक्षणपद्धतीत व रचनेत नैतिक मूल्यांचे शिक्षण व संवर्धन आवश्यक करा असा विचार जोराने मांडला जात आहे. परंतु असे शिक्षण देण्यास खुद्द **संस्थेला नैतिक अधिष्ठान हवे व शिक्षकाचे नैतिक धैर्य उच्च हवे**. असे अधिष्ठान व धैर्य खाजगी व्यवस्थापनाला किती प्रमाणात आहे व त्या व्यवस्थापनाखालील शिक्षकामध्ये ते किती राहणे शक्य आहे याचे दिग्दर्शन पूर्वी केले आहेच. काही अपवाद वगळता, अनैतिक व गैरप्रकारानी लिडबिडलेले खाजगी व्यवस्थापन, आपल्या शिक्षणसंस्थातून या मूल्यांचे संवर्धन करण्यास अडथळाच आहे, हे निश्चित.

**खाजगी व्यवस्थापन व शैक्षणिक विकासाचे नवे मार्ग**:–समानशाळा पद्धति, परिसर शाळा, शाळासमूह, श्रमानुभव व समाजसेवा, नैतिक मूल्यांचे संवर्धन आदि आयोगप्रणीत शैक्षणिक विकासमार्गांचा अवलंब करण्यास खाजगी व्यवस्थापन सहाय्यक होणार नसून अडसरच ठरेल, हे वरील विवेचनावरून कोणीहि मान्य करील.

# ५

# खाजगी व्यवस्थापन मौलिक सहाय्य करण्यास समर्थ आहे का ?

मागिल प्रकरणात आजच्या खाजगी संस्था नव्या शैक्षणिक उद्दिष्टांच्या पूर्ततेला हातभार लावण्यास कशा असमर्थ आहेत किंबहुना त्या अडथळाच ठरणे कसे संभवते हे स्पष्ट केले आहे. या व पुढील प्रकरणात महाराष्ट्र शासनाने जे नवे अनुदानसूत्र स्वीकारले आहे, त्याचे संदर्भातहि खाजगी संस्थांच्या अस्तित्वाचे प्रयोजन काही आहे काय, आणि त्यांचे अस्तित्व टिकवणे उपकारक होणार आहे काय–या दोन प्रश्नांचा विचार करावयाचा आहे. नव्या अनुदान सूत्रामुळे खाज़गी संस्था–चालकांच्या कारभारावर व मनोवृत्तीवर चांगला प्रकाश पडण्यास मदत झाली आहे; ते सूत्र त्यांच्या भविष्यातील प्रयोजनाचा निकष ठरणार आहे, यात शंका नाही.

या चर्चेला सुरवात करण्यापूर्वी दोन गोष्टींचा खुलासा करणे इष्ट वाटते.

**खाजगी व्यवस्थापनाची महनीय कामगिरी.**–स्वातंत्र्यपूर्व काळात खाजगी शिक्षण संस्थांनी शिक्षणप्रसाराची बहुमोल कामगिरी बजावली आहे. अनेक आजीवसेवक व समाजसेवक यांनी अत्यंत त्यागपूर्वक निष्ठेने व ध्येयवादाने हे कार्य केले आहे. प्रत्यक्ष स्वातंत्र्य–आंदोलन काळांत अनेक खाजगी संस्थांनी मूकपणे वा गुप्तपणे आंदोलनाला सहाय्य केले. ही खाजगी व्यवस्थापनाची स्वातंत्र्यपूर्व कामगिरी सुवर्णाक्षरांनी लिहिण्यासारखी आहे हे आम्ही मान्य केले आहे ही पहिली गोष्ट.

**आजहि अपवाद आहेत**:–दुसरी गोष्ट, आजही अशा काही खाजगी संस्था आहेत की त्यामध्ये नव्या भारताच्या निर्मितीसाठी लागणारा नवा ध्येयवाद, नवी दृष्टी व नवी प्रेरणा आहे. तरुण कार्यकर्ते अविरत त्यागपूर्वक खपत आहेत; काही जुन्या संस्थाही आपली जुनी परंपरा उज्ज्वल राखण्यासाठी झटत आहेत. त्यांच्याबद्दल आम्हांला आदर व अभिमान आहे. अशा संस्थाबद्दल आम्हांला काहीही म्हणावयाचे नाही. पण आजच्या शिक्षणाच्या अवाढव्य पसाऱ्यात या अशा स्वतःच्या अस्तित्वाच्या प्रयोजनाची जाणीव असणाऱ्या संस्था फारच अल्प आहेत. बाकीच्या केवळ दुकानदारी स्वरूपाच्या आहेत.

मागील प्रकरणात (प्र. २) उल्लेख केल्याप्रमाणे सेवेची भावना ज्यांच्यात नाममात्रच आहे, शाळा काढणे व चालविणे हा ज्यांचा व्यवसाय झाला आहे आणि स्वत:च्या प्रतिष्ठेचे एक साधन म्हणून जे शाळा चालवितात, ज्यांच्या व्यवस्थापनात शैक्षणिक दृष्टी नाही अशाच बहुसंख्य शाळाबद्दल ही चर्चा आहे. अशा शाळा किती असाव्या याची कल्पना, शाळांची वाढ गेल्या १६ वर्षात व गेल्या ८ वर्षात कशी एकदम झाली आहे हे ध्यानी घेतल्यास येईल.

**महाराष्ट्र राज्यातील बहुसंख्य माध्यमिक शाळांबाबत वस्तुस्थिती:-** महाराष्ट्र राज्यात १९५०-५१ साली फक्त ७६५ माध्यमिक शाळा होत्या. १९५८-५९ साली त्यांची संख्या १७५० झाली म्हणजे आठ वर्षात सुमारे १००० शाळांची भर पडली. पण पुढील ८ वर्षात मात्र २५११ शाळांची भर पडली. आम्ही खाजगी माध्यमिक शाळांबद्दल केलेली विधाने महाराष्ट्रातील आजच्या बहुसंख्य शाळांना लागू पडतात असे आम्ही म्हणतो. सर्वच शिक्षण-संस्थांना व चालकांना एकाच मापाने मोजण्याची चूक आम्ही करू इच्छित नाही; करीत नाही.

**नवे अनुदान सूत्र:-**नव्या अनुदान सूत्राचे परिणाम व त्यावरील चालकांच्या प्रतिक्रिया व त्यातून बाहेर आलेले सत्य हे नीट लक्षात येण्यासाठी (अ) अनुदानपद्धतींतील गृहीत तत्त्व (आ) नव्या अनुदानाने नेमके काय दिले. (इ) व काय दिले नाही, या तीन गोष्टी सर्वांच्या लक्षात आणून देणे आवश्यक आहे.

**अनुदानपद्धतीचे गृहीत कृत्य:-**संस्था-संस्थापकांनी प्रथम एक वर्ष स्वत: जनतेच्या सहाय्याने उभारलेल्या निधीतून व गोळा केलेल्या फीमधून शाळा चालवावी, व पुढील वर्षी मागील वर्षाच्या खर्चापैकी अनुदानपात्र खर्चावर सरकारकडून अनु-दान म्हणजे मागाहून मदत घ्यावी हे आजपर्यंतच्या अनुदान-पद्धतीचे गृहीत कृत्य आहे. नव्या अनुदान सूत्राने अनुदानार्ह, बाबी कोणत्या व अनुदानाचे प्रमाण कसे असावे हे ठरविले. खरे पाहू जाता त्याचा या गृहीत कृत्याशी तादृश प्रत्यक्ष काहीहि संबंध नाही.

**गृहीत कृत्याला खो:-**तरी या गृहीत कृत्याला खो देऊन आता शाळा-व्यवस्थापनाकडून अनु-दानाऐवजी आगाऊ-दानाची मागणी करण्यात येत आहे.

**आर्थिक असमर्थता सिद्ध झाली:-**आजपर्यंत शाळेचा खर्च कोणत्याहि प्रकारे वाढला की फी दर वाढवून देण्याची वा अनुदानाची टक्केवारी वाढवून देण्याची मागणी व्यवस्थापन करीत असे त्यापैकी एक वा दोन्ही मिळवून व्यवस्थापन

शाळा चालवी. (फी वाढविण्याची परवानगी न मिळता/घेता काही व्यवस्थापने फी वा अन्य नावाने पालकाकडून पैसा वसूल करीत, आजहि करतात.) यामुळे शाळाव्यवस्थापनाची आर्थिक असमर्थता प्रगट होई तरी व्यवस्थापनाने ती असमर्थता आगाऊ-दान मागून आजपर्यंत व्यक्त केली नव्हती. निदान अगोदर खर्च करून नंतर तो घेण्याची खाजगी व्यवस्थापनाची तयारी होती. पण आता व्यवस्थापनाला शासनाने जो खर्च करण्यास सांगितले तो जवळजवळ सर्व खर्च शासन देणार असले तरी तो आगाऊ-द्या अशी व्यवस्थापनाने मागणी करून आपली संपूर्ण आर्थिक असमर्थता स्पष्टपणे प्रगट केली आहे.

**आगाऊ-दान पद्धती:**-या मागणीमुळे खाजगी व्यवस्थापनाने केवळ आर्थिक असमर्थताच प्रगट केली आहे असे नव्हे, आपल्या स्वतःच्या अस्तित्वालाच सुरूंग लावला आहे. शासनाच्या शासकीय शाळांप्रमाणे त्या खर्चाबरोबरच एवढेच नव्हे तर तीन महिने आगाऊ खाजगी शाळांचा खर्च जर शासनाला करावा लागणार असेल, व तसा तो करा असे खाजगी व्यवस्थापन शासनास सांगणार असेल (सांगत आहेच) तर मग त्या शाळा 'खाजगी' ठेवण्याचे प्रयोजनच काय, असे कोणीहि अधिक ठामपणे विचारू शकेल. सरकारने व्यवस्थापनाची आगाऊ-दानाची मागणी मान्य केल्यास आर्थिक दृष्टया तरी खाजगी व्यवस्थापन टिकण्याचे व टिकविण्याचे काहीच प्रयोजन उरत नाही.

**खाजगी व्यवस्थापनाची छोटीशी भागीदारी:**-खुद्द नव्या अनुदान-सूत्रानेच शासन व व्यवस्थापन यांच्या आजपर्यंतच्या भूमिकात इतका क्रांतिकारी बदल केला आहे की व्यवस्थापनाला त्या सूत्रान्वये दिलेली छोटीशी भागीदारी जर ते स्वीकारणार नसेल तर त्याची मुळीच जरूर नाही असा निर्णय घेणे भाग पडेल.

**नव्या सूत्रामुळे आणखी क्रांतिकारी बदल :**-आजपर्यंत अनुदान संहितेच्या नियम ८७ व अन्य नियमामध्ये लिहल्याप्रमाणे 'हाती पैसा असेल तर' (Subject to funds being available) अनुदान देण्याची शासनाची भूमिका असे. नव्या सूत्रान्वये माध्यमिक शाळेस सर्वसाधारणपणे लागणाऱ्या आवर्ती खर्चांपैकी नागरी विभागात ९७½ टक्के व ग्रामीण विभागात ९९ टक्के खर्च करण्याची जबाबदारी शासनाने घेतली आहे. शाळा सरकारमान्य करणे न करणे सरकारच्या हाती असले (आजहि आहेच) तरी एकदा मान्यता दिली की

तिचा ९७½।९९ टक्के खर्च देणे शासनाची जबाबदारी झाली आहे, शासनाने ती पत्करली आहे.

शासनाने ही निश्चित जबाबदारी घेतल्यामुळे आता (सरकारमान्य) माध्यमिक शाळा चालू राहिली पाहिजे, ती कोणी बंद पाडणार नाही व माध्यमिक शिक्षण घेऊ इच्छिणाऱ्या विद्यार्थ्यास ते घेण्याची संधि मिळणार नाही असे होऊ नये हे पाहण्याची जबाबदारी सरकारची झाली आहे.

**व्यवस्थापनाची जबाबदारी–थोडी वर्गणी** :–आजपर्यंत साहजिकच खाजगी व्यवस्थापनाची आर्थिक जबाबदारी अनिश्चित होती ती २½।१ टक्का वर्गणी देण्याची झाली आहे. जवळजवळ सर्व आर्थिक जबाबदारी शासनाने घेतल्यामुळे व्यवस्थापनाच्या दृष्टीने नवी अनुदान पद्धत म्हणजे वर्गणी किंवा निश्चित भागीदारी पद्धत होय. **जबाबदारी सरकारची, वर्गणी व्यवस्थापनाची हे नव्या सूत्राचे गृहीत कृत्य आहे.**

**घटनात्मक जबाबदारी हे पुढील क्रमप्राप्त पाऊल** :–खरे पाहता स्वातंत्र्य मिळताच स्वकीय सरकारने मुलांच्या शिक्षणाची जबाबदारी स्वत: घेऊन भारतीय मुलाला शिक्षण घेण्याचा हक्क देणे अवश्य होते. घटनाकारांनी हा अधिकार दोन अर्थाने मर्यादित प्रमाणात दिला. (अ) मूलभूत अधिकार म्हणून तो मान्य न करता मार्गदर्शक तत्त्व म्हणून तो स्वीकारला; आणि (ब) फक्त १४ वर्षे वय पूर्ण होईपर्यंतच्या मुलाचा हा हक्क मान्य केला. आज १७–१८ वर्षांनंतर १४ वर्षे वयानंतरच्या मुलाचा म्हणजे माध्यमिक शिक्षण घेणाऱ्या मुलाचा हक्क सरळ उघडपणे मान्य न करता महाराष्ट्र शासनाने अप्रत्यक्षपणे मान्य केला आहे. नव्या अनुदानसूत्राद्वारे शासनाने हे क्रमप्राप्त पुरोगामी पाऊल टाकले असा या सूत्राचा अर्थ आहे.

**गृहीत तत्त्व व गृहीत कृत्य** :–जुन्या अनुदानपद्धतीचे गृहीत तत्त्व नष्ट करण्याची मागणी व्यवस्थापन करीत आहे. तर माध्यमिक शिक्षणाची जबाबदारी महाराष्ट्र शासनाने स्वीकारली हे नव्या सूत्राचे गृहीत कृत्य आहे. पूर्वी जबाबदारी खाजगी व्यवस्थापनाची, मदत सरकारची अशी या दोहोंची भूमिका असे, आता जबाबदारी सरकारची फक्त २½।१ टक्का मदत खाजगी व्यवस्थापनाची झाली आहे. अशा प्रकारे व्यवस्थापन व शासन यांच्या भूमिकांत क्रांतिकारी बदल झाला आहे.

**गृहीत कृत्य कसे ?** :–नव्या अनुदानसूत्राचे नवे गृहीत कृत्य समजावून घेण्या-करता नवे अनुदानसूत्र सुस्पष्टपणे समजावून घेऊ या.

(१) शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांना मंजूर दराने देण्यात येणारे वेतन आणि भत्ते, यावर १०० टक्के.

(२) नियमाप्रमाणे शाळा इमारत भाडे १०० टक्के.

(३) कर्मचारी व इमारत भाडे यावरील खर्चाव्यतिरिक्त अन्य अनुदान-पात्र बाबीवरील खर्च, १०० टक्के (किंवा एकूण अनुदान खर्चाच्या १२ टक्के यातील जो कमी असेल तो)

(४) प्रत्येक विद्यार्थ्यामागे दरवर्षी १ रुपया.

(५) भविष्यनिधी योजनेतील व्यवस्थापक हिस्सा, १०० टक्के. या पाच बाबींच्या रकमांच्या बेरजेतून शासन

(अ) विद्यार्थ्यांकडून वसूल होणारी फी,

(ब) नागरी व ग्रामीण विभागात एकूण अनुदान रकमेच्या अनुक्रमे २½ व १ टक्का रकम वजा करून बाकी रक्कम व्यवस्थापनाला अनुदानरूपाने देते.

**अनुदान नव्हे भागीदारी पद्धत** :–फीचे जे उत्पन्न व्यवस्थापनाला मिळते ते सरकारी नियमांचे आधारे मिळते म्हणून ते सरकारने प्रत्यक्ष दिले काय किंवा पालकाकडून देवविले काय, सारखेच. याचा अर्थ प्रत्यक्ष वा अप्रत्यक्ष रितीने सरकार फक्त २½।१ टक्का सोडून शाळेचा सर्व आवर्ती–शाळा चालविण्याचा–खर्च देते, असा होतो म्हणजे पूर्वी म्हटल्याप्रमाणे शाळेच्या निर्वाह खर्चात शासन व व्यवस्थापन यांची ९७½ : २½ वा ९९ : १ अशी ही भागीदारी पद्धत आहे.

नव्या अनुदानसूत्रामुळे अनुदान कमी झाले असे कांही नागरी शाळांच्या व्यवस्थापनाकडून सांगण्यात येते. याबद्दलच्या विचारांचा जो घोळ उत्पन्न करण्यात आला आहे तो नवी पद्धत ही अनुदान पद्धतच नव्हे, व सरकारकडून मिळणारा खर्च अनुदान नव्हे, भागीदारीचा ९७½।९९ टक्के हिस्सा आहे हे ध्यानी बाळगले तर दूर होईल. नव्या सूत्राचा विचार अनुदानाच्या जुन्या भाषेत न करता या भागीदारीच्या भाषेतच यापुढे केला पाहिजे.

**नव्या अनुदानसूत्राने भागीदारी पद्धतीने काय दिले ?** :– (१) शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांना पूर्ण वेतन नियमितपणे मिळण्याची शक्यता निर्माण करून दिली, (शासनाने पुढील क्रमप्राप्त पावले उचलून ती प्रत्यक्षात अजून आणावयाची आहे.)

(२) शिक्षकांच्या वाढल्या वेतनामुळे पालकावर फीचा भार वाढणार नाही असा पालकांना दिलासा दिला,

(३) फी उत्पन्न वाढविण्याकरता वर्गात जास्त विद्यार्थी घेण्याची व्यवस्थापनाची वृत्ति राहणार नाही अशी परिस्थिती निर्माण केली. त्यामुळे विद्यार्थ्यांचे शिक्षण अधिक चांगले होण्याची शक्यता निर्माण झाली,

(४) शिक्षक व इतर कर्मचारी यांवरील खर्च व इमारत भाडे देण्याची जबाबदारी सरकारने घेतलीच पण याशिवाय इतर जो निर्वाह खर्च लागतो तो सर्व (एकूण अनुदान रकमेच्या १२ टक्के) खर्च लहान व मोठ्या सर्व शाळांना मिळेलच अशी खात्री दिली. यामुळे सर्व शाळा सर्वसाधारणपणे बऱ्या चालतील अशी शाश्वति दिली.

**अनुदानास मान्य बाबी** :–ज्या बाबी अनुदानास मान्य असत व आहेत त्यांची यादी अनुदानसंहितेत 'अ' सूचीमध्ये दिली आहे. यातील प्रमुख बाबी पुढीलप्रमाणे:– (१) रजेबद्दल भत्ता, (२) शिक्षकाकरता वाईट हवामान व पाणी-भत्ता, (३) शिक्षकाला प्रशिक्षणकाळात दिलेला पूर्ण पगार वा विद्यावेतन आणि त्याचे जागी ठेवलेल्या शिक्षकाचा पगार भत्ते इत्यादि, (४) व्यवसाय मार्गदर्शक शिक्षकाचा भत्ता, (५) १ जून १९३९ पूर्वी संस्थेने मान्य केलेले निवृत्तिवेतन व ग्रॅच्युइटी, (६) ७७·२·३ प्रमाणे ग्रॅच्युइटी, (७) पूर्ण वेळ वा अर्धवेळ ग्रंथपाल वेतन, (८) ऑफिस स्टेशनरी व इतर आवश्यक रजिस्टर्सचा छपाई खर्च, (९) शिक्षक नेमणुकीकरता दिलेल्या जाहिरातीचा खर्च, (१०) शाळेच्या कामासाठी योग्य प्रवास खर्च (कन्व्हेअन्स), (११) ड्राईंग शिक्षकाला रु. ४० पर्यंत बोनस. पुढील बाबीवरील योग्य खर्च (१२) टिफिनरूम करता, (१३) शारीरिक शिक्षणातील गुणवत्ता कौशल्यासाठी बक्षिसे, (१४) शाळेची बाग, (१५) इलेक्ट्रिक (१६) टेलिफोन, (१७) प्राथमिक उपचार व्यवस्था, (१८) दृकश्राव्यसाधने, (१९) शैक्षणिक सहल, (२०) जमाखर्च तपासणी, (२१) सेल्स टॅक्स व जनरल टॅक्स, (२२) सामान दुरुस्ती, (२३) विद्यार्थी सहकारी भांडाराचे व्यवस्थापन (२४) एस. एस. सी. परीक्षेसाठी लागणारा नोंदणी खर्च, शिवाय (२५) शैक्षणिक परिषदांचा वर्गणी खर्च व शाळा प्रतिनिधीने अधिकात अधिक प्रतिवर्षी तीन परिषदांना हजर राहण्याबद्दल केलेला खर्च.

या यादीवरून सर्वसाधारणपणे शाळा नीट चालविण्याकरता आवश्यक तो खर्च सरकार पूर्वी अनुदानास पात्र ठरवीत असे व आता तो १०० टक्के देणार आहे असे स्पष्ट होते.

(५) **नवीन बाबींचा समावेश** :–पूर्वी काही बाबी खर्चास मान्य पण अनुदानास अमान्य असत. या बाबतीतील व्यवस्थापनाच्या मागणीचा विचार करून त्यातील ज्या बाबी शाळा चांगल्या चालण्यास आवश्यक वाटल्या त्या शासनाने अनुदानमान्य बाबी ठरविल्या. उदा. भविष्य निधीतील व्यवस्थापकाचा हिस्सा, इमारत भाड्यात नगरपरिषद कर व अन्य करांचा समावेश नसेल तर ते कर, खेळाच्या मैदानाचे भाडे, 'सायन्स क्लब' खर्च, विशिष्ट विषय–शिक्षकांना दिलेली जादा वेतनवाढ, इत्यादि. अनुदान संहितेतील 'अ' सूचीमध्ये असलेल्या अनुदानार्ह बाबींत या बाबींची भर पडली आहे व त्या सर्व बाबींवर १०० टक्के खर्च (एकूण अनुदान रकमेच्या १२ टक्क्यापर्यंत) मिळणार आहे. यावरून **शाळा चांगल्या चालण्याकरता अवश्य ते करण्याची शासनाची तयारी सिद्ध झाली.**

(६) इमारत भाड्यावर १०० टक्के (खर्चाच्या ७½ टक्क्या पर्यंत) खर्च मिळण्याची शाश्वति झाल्यामुळे शाळा बऱ्या इमारतीत भरविता येण्याची सोय झाली.

एकूण शाळा विशेषत: कमी विद्यार्थी असलेल्या नागरी व शेकडो ग्रामीण शाळा आजच्यापेक्षा सर्वच प्रकारे चांगल्या चालविता येण्याची सोय नव्या सूत्राने करून दिली आहे. त्यामुळे हे सूत्र शिक्षकास, पालकास, **व विशेषत: विद्यार्थ्यांचे शिक्षण अधिक उत्तम प्रकारे होण्यास निश्चित उपकारक झाले आहे.**

**दरडोई एक रुपया** :–साधारण शाळांच्या निर्वाहाची सोय या प्रकारे करून देऊन शिवाय शाळांना अवश्य तो प्रासंगिक खर्च करता यावा (ज्याचा हिशेब मागितला जाणार नाही) म्हणून शासन शाळांना दरवर्षी विद्यार्थ्यांच्या संख्ये-इतके रुपये देणार आहे.

**व्यवस्थापन प्रतिकूल का ?** :–नवे अनुदानसूत्र शिक्षणविकासास निश्चितपणे पोषक असूनहि सर्वसाधारण व्यवस्थापनाने या सूत्राचे सहर्ष स्वागत केले नाही. स्वागताचा शब्द जेमतेम उच्चारून व्यवस्थापनाने सूत्रावर प्रतिकूल प्रतिक्रियाच व्यक्त केल्या. थोडे अपवाद वगळता सर्वच व्यवस्थापनांनी प्रतिकूल प्रतिक्रिया व्यक्त केल्या याचे प्रमुख कारण सूत्राने शाळेच्या आवर्ती खर्चात व्यवस्थापनाची निश्चित केलेली अनिवार्य २½।१ टक्का वर्गणीची भागीदारी होय.

**त्यागी पूर्वजांच्या वारसांची मनोवृत्ति** :–स्वातंत्र्यपूर्वकाळात खाजगी व्यवस्थापनाने शिक्षणप्रसार, शिक्षणविकास, एवढेच नव्हेतर स्वातंत्र्य आंदोलनास अनेक प्रकारे झीज सोसून त्यागपूर्वक मदत केली. ही खाजगी व्यवस्थापनाची कामगिरी सुवर्णाक्षरांनी लिहण्याइतकी महनीय आहे हे आम्ही मान्य केलेच

आहे. पण आज तेच व्यवस्थापन आवर्ती खर्चात फक्त २½।१ टक्क्याची भागीदारी करण्यास सांगितले तर 'संस्थाचालकांवर हा जुलमाचा कळस आहे' असे म्हणत आहे. यावरून व्यवस्थापनाची कमालीची आर्थिक असमर्थता तर प्रगट होतेच पण पूर्वकालीन कष्टाळू व त्यागी शिक्षणसंस्थाचालकांच्या या आजच्या वारसांच्या मनोवृत्तीवर लख्ख प्रकाश पडतो.

**प्रतिक्रियेतून स्पष्ट झालेली बाब** :–या इतक्या कमी अनिवार्य वर्गणीला झालेल्या विरोधातून जी बाब स्पष्ट झाली ती म्हणजे व्यवस्थापन देणग्या, वर्गण्या आदि रूपाने स्वतंत्रपणे पैसा उभारून शाळेच्या आवर्ती खर्चात भर घालण्यास पूर्णपणे असमर्थ आहे, (२) केवळ फीचे उत्पन्न व अनुदान रकम यावरच शाळेचा प्रपंच ते चालविते. तसेच या पुढेहि इतका कमी भार उचलण्याचा आत्मविश्वासहि व्यवस्थापनात राहिलेला नाही, असा या विरोधाचा स्पष्ट अर्थ आहे.

**मध्यस्थ कशासाठी ?** :–सर्व खर्च जर शासनाने द्यावयाचा तर मग खाजगी व्यवस्थापकांचा हा 'मध्यस्थ' (दलाल) वर्ग ठेवावयाचा कशासाठी ? खाजगी व्यवस्थापनाचे लोकाभिमुखत्व ते कोठे राहिले ? या दोन प्रश्नांची उत्तरे आपले अस्तित्वाचे प्रयोजन पटवून देण्यासाठी खाजगी व्यवस्थापनाला द्यावी लागतील.

**अती तीव्र प्रतिकूल प्रतिक्रिया**:–काही अपवाद वगळता सर्वसाधारण व्यवस्थापनाने २½ /१ टक्का भागीदारीला विरोध केला खरा पण या पूर्ण सूत्रालाच मोठ्या नागरी आणि विशेषत: (अ) आजीवसेवकी आणि (ब) स्थानिक नव्हे तर संस्थानिकी स्वरूपाच्या व्यवस्थापनांनी कडाडून विरोध केला. याचे कारण पूर्वीच्या प्रकरणात सूचित केल्याप्रमाणे आजीवसेवकांना ज्यादा भविष्यनिधी, विमा, कमी काम, अधिक पगार आदि सवलती मिळतात. (आजीवसेवकी शाळा हा खर्च कौशल्याने बहुधा शाळा खर्चातच दाखवित.) त्या आता चालू राहणे /ठेवणे शक्य होणार नाही हे होय.

**संस्थानिकी व्यवस्थापनाच्या शाळा**:–एक सोसायटी / संस्था एकच शाळा आपल्या गावीच चालविते अशा शाळा निम्म्यापेक्षा कमी आहेत. महाराष्ट्रातील बाकीच्या निम्म्यापेक्षा अधिक शाळा ज्या सोसायटया चालवितात त्या एकापेक्षा अधिक शाळा व अन्य संस्था चालवितात. यात ४/५ शाळा चालविणाऱ्या सोसायटयापासून शे दोनशे शाळा/शिक्षणसंस्था चालविणाऱ्या सोसायटया आहेत. सोसायटीचा व्याप जितका मोठा तितका व्यवस्थापन खर्च जास्त. लहान सोसायटी केवळ कारकून/चिटणिस यांचा व्यवस्थापन खर्च

करते तर मोठमोठ्या सोसायटयांची मध्यवर्ती व उपकार्यालये, शाळानिरीक्षक आदि खूप मोठा कर्मचारी वर्ग आहे. प्रशासनाच्या यंत्रणेशी समांतर अशी ही यंत्रणा आहे. त्यांचा खर्च सोसायटी शाळातून येणाऱ्या फी उत्पन्नातून व अनुदान रकमेतून करते. अशाप्रकारे या संस्था शाळा चालवीत नाहीत, तर **शाळाच संस्था चालवितात.**

**तीव्र विरोधाचे कारण**:–व्यवस्थापनाचा हा खर्च नव्या अनुदानपद्धतीतून मिळण्याची वा काढण्याची शक्यता आता राहिलेली नाही हे तीव्र विरोधाचे कारण होय. त्यामुळे संस्थानी व्यवस्थापनाची, ही यंत्रणा कोलमडून पडणार व मग आजपर्यंत या व्यवस्थापनात असलेल्यांचे काय होणार असा गंभीर प्रश्न त्यांचे समोर उत्पन्न झाला आहे. मोठ्या, नागरी, आजीवसेवकी व संस्थानिकी स्वरूपाच्या व्यवस्थापनांच्या तीव्र प्रतिकूल प्रतिक्रियेचे हे कारण आहे.

**भीति की धमकी ?**:–ज्या व्यवस्थापनाच्या मूळावरच नव्या अनुदान-सूत्राने आघात होणार आहे त्यांनी आपल्या व्यवस्थापनाखालील शाळा बंद पडतील अशी भीति व्यक्त केली आहे वा धमकी दिली आहे. शाळांच्या खाजगी व्यवस्थापनांचा विचार करता जी व्यवस्थापने शाळा चालवीत नाहीत तर स्वतः शाळांचे उत्पन्नावर जगतात वा स्वतःमधील काही व्यवस्थापकांना शाळातून 'ऑनररियम' आदि काही देऊन जगवितात ती व्यवस्थापने नव्या काळात का जगवायची असा खरा प्रश्न आहे

**त्यागपूर्वक झीज सोसल्याचे दाखले**:–या व्यवस्थापनांनी त्यागपूर्वक झीज सोसून शिक्षणप्रसार केल्याचे दाखले दिले आहेत. आम्ही शेकडो वर्षे वेद-विद्या घोकून रक्षण केली म्हणून आमचे वर्चस्व माना हे पुरोहित वर्गाचे म्हणणे वा मोंगलांशी लढून आमच्या पूर्वजांनी राज्ये स्थापन केली म्हणून आमच्या जहागिऱ्या व तनखे कायम ठेवा हे संस्थानिकांचे म्हणणे त्याहून या शिक्षण-संस्थानिकांचे म्हणणे वेगळे दिसत नाही. नव्या समाजात हे म्हणणे मानायचे का ? या प्रश्नाचे उत्तर दिले जाणे अवश्य आहे.

भारताच्या स्वातंत्र्योत्तर काळात खाजगी व्यवस्थापनाचे प्रयोजन राहिलेले नाही, आर्थिकदृष्टया ते अगोदरच असमर्थ झाले आहे. शिक्षणआयोगप्रणीत मार्गांनी शैक्षणिक विकास घडवून आणण्यास ते सहाय्यक ठरणार नाही, नव्या अनुदानसूत्राच्या चौकटीत–भागीदारी पद्धतीत–बसण्याची त्याची तयारी नाही, म्हणून. त्याऐवजी व्यवस्थापनाच्या नव्या आकृतिबंधाचा विचार करण्याची वेळ आली आहे, असे आम्हाला वाटते.

# ६

# शिक्षणसंस्थाने वाढू देणार काय ?

महाराष्ट्र शासनाने स्वीकारलेले नवे अनुदानसूत्र शिक्षकांना नियमितपणे पूर्ण पगार देण्याची निश्चिती देण्यास समर्थ आहे. त्यामुळे शिक्षकाची कार्य-क्षमता निश्चितपणे वाढणार आहे. तसेच हे सूत्र माध्यमिक शिक्षणाची आर्थिक जबाबदारी फार मोठ्या प्रमाणावर शासन घेण्यास तयार आहे याचे निदर्शक आहे म्हणून आम्ही या सूत्राचे हार्दिक स्वागत केले आहे. शाळा योग्य तऱ्हेने चालविण्यास आवश्यक शैक्षणिक बाबींवर १०० टक्के खर्च देण्याची तयारी शासनाने गेल्या काही महिन्यात आपल्या निर्णयांनी दाखविली आहे, हे निर्णयहि त्याच तयारीचे निदर्शक आहेत म्हणून स्वागतार्ह आहेत असे आमचे मत आहे.

पण आवर्ती खर्चाबाबतच्या अनुदानसूत्रात घेतलेल्या एका निर्णयाचा व अनावर्ती खर्चाबाबत न घेतलेल्या निर्णयाचा एक धोकादायक परिणाम होणे संभवते. तो या प्रकरणात स्पष्ट करण्याचा आमचा मानस आहे.

**संस्थांची संस्थाने बनण्यास मदत**:–एका संस्थेने कोठे किती शिक्षणसंस्था स्थापाव्या याला आज बंधन नाही त्यामुळे आजच काही संस्थांना संस्थानांचे स्वरूप आले आहे, हे पूर्वी सांगितले आहेच. शाळांचे व शिक्षणसंस्थांचे जाळे विणणाऱ्या या संस्थांत फार मोठ्या प्रमाणात केंद्रीकरण झाले आहे. ते शिक्षकांना जाचक व शिक्षण खात्याच्या कार्यक्षम कारभारास बाधक आहे. हे आम्ही पूर्वी दाखविले आहे म्हणून ते संपूर्णतया अ–शैक्षणिक आहे. नव्या अनुदानसूत्राबाबतच्या ज्या एका निर्णयामुळे या प्रकारच्या शिक्षणसंस्थान–निर्मितीला अधिकच प्रोत्साहन मिळणार आहे. तो निर्णय असा.

**इमारतीचे १०० टक्के भाडे**:–खाजगी व्यवस्थापनाची स्वतःची इमारत असो व ते भाड्याच्या जागेत शाळा भरवीत असो, शासन फक्त अनुदान रकमेतून बांधलेला इमारत हिस्सा सोडून बाकीच्या सर्व इमारतीचे १०० टक्के भाडे देणार आहे.

इमारतसंपन्न व्यवस्थापनालाहि पूर्ण भाडे–वार्षिक दुरुस्ती व रंगाई इत्यादि खर्च नव्हे–देण्याचा निर्णय सूक्ष्म व दूरगामी परिणामांचा विचार न करता शासनाने घेतलेला आहे.

**नव्या निर्णयाचा परिणाम**:–नव्या निर्णयाने सर्वच व्यवस्थापनांना शासनाने इमारत भाडे दिले आहे. ज्या व्यवस्थापनाच्या स्वतःच्या इमारती आहेत ते व्यवस्थापन मिळणाऱ्या भाड्यातून २½/१ टक्का वर्गणी भरेल व त्याचे हाती पैसा शिल्लक राहील. या रकमेचा उपयोग सुरवातीचा खर्च म्हणून उपयोगात आणून ते व्यवस्थापन नवनवीन ठिकाणी शाळा स्थापन करील व/वा असलेल्या शाळांची वाढ करील. अशाप्रकारे आजच्या इमारतसंपन्न संस्थांच्या आणखी जास्त/वा मोठमोठ्या शाळा होतील.

या उलट जे व्यवस्थापन आपल्या शाळा भाड्याने घेतलेल्या इमारतीत भरविते ते आलेले सर्व भाडे मालकाला देईल. २½ टक्के वर्गणीच त्यांना देणगीरूपाने आणावी लागेल. शाळा व शाळेच्या इमारती वाढविणे त्याला अशक्य होईल.

**इमारत संपन्न व्यवस्थापनाची वाढ**:–अशाप्रकारे इमारतसंपन्न नागरी शिक्षणसंस्था–व्यवस्थापने शिक्षणसंस्थाने स्थापू शकतील पण गरीब ग्रामीण स्वतःची इमारत नसलेली व्यवस्थापने सदाच गरीब राहतील, ती वाढू शकणार नाहीत.

ज्या भागात आज इमारती नाहीत त्या भागात त्या वाढणार नाहीत व ज्या भागात आज आहेत त्याच भागात त्या वाढतील. आज ज्या संस्था गरीब व लहान आहेत त्या कायमपणे गरीब व लहान राहतील पण श्रीमंत संस्था अधिक श्रीमंत होत जातील. पैशापाशी पैसा जातो व गरीबीपाशी गरीबी जाते, असा विपरित परिणाम आजहि योजनाबद्ध विकासाच्या काळात या निर्णयामुळे शिक्षण क्षेत्रात होणार आहे.

**गरीबी–श्रीमंतीचे ध्रुवीकरण**:–हा झाला घेतलेल्या निर्णयाचा होऊ घातलेला अनिष्ट परिणाम. यापुढे घ्यावा लागणारा निर्णय दूरगामी परिणामांचा विचार न करता घेतला गेल्यास श्रीमंत अधिक श्रीमंत व गरीब कायम गरीब रहावे याच प्रकाराची पुनरावृत्ति होण्याचा संभव आहे.

**अनावर्ती खर्चाचा प्रश्न**:–अनुदानसूत्रात फक्त आवर्ती खर्चाचा विचार झाला आहे. आवर्ती खर्चाची ९७½/९९ टक्के जबाबदारी शासनाने घेतली आहे. अनावर्ती खर्चाची जबाबदारी कोण घेणार ? किती प्रमाणात घेणार ? या प्रश्नांची उत्तरे अजून मिळावयाची आहेत.

**अनावर्ति खर्च कसा चाले**:–आजपर्यंत इमारती ग्रंथालये, प्रयोगशाळा, शिक्षणसाधने आदि बाबींकरता व्यवस्थापन प्रमुखतः वाढीव फी उत्पन्नातून

खर्च करी व सरकार कर्ज/अनुदान/दानरूपाने मदत करी. आता? नव्या अनुदानसूत्रानुसार सर्व फीचे उत्पन्न मिळणाऱ्या रकमेतून वजा होणार असल्यामुळे व्यवस्थापनाजवळ शिल्लक (surplus) राहणार नाही. अगदी पूर्वकाळी खाजगी व्यवस्थापन याकरता पैसा झोळी फिरवून वर्गण्या व देणग्या आणून उभा करी. पण आता ही शक्यता राहिली नाही, हे खाजगी व्यवस्थापनाला मान्य आहे. कोणाचा जन्म, कोणाचा मृत्यु वा एखाद्या धनिकाची कोणत्या तरी कारणाने/हेतूने जागृत झालेली दातृत्वबुद्धी वा वर्षाकाठी एखादे नाटक वा चलच्चित्रपटाचे उत्पन्न अशा मार्गाचा अवलंब केल्याशिवाय खाजगी व्यवस्थापन अनावर्ती खर्चासाठी पैसा उभारू शकत नाही. हे उत्पन्न सर्वस्वी अनिश्चित असते व म्हणून त्या भरवशावर महाराष्ट्रातील आजच्या ४२०० शाळांच्या व पुढे वाढणाऱ्या शाळांच्या अनावर्ती खर्चाची निश्चित विकास योजना आखणे अशक्य आहे.

खाजगी व्यवस्थापनाला पालकाशिवाय अनावर्ती खर्चाकरता पैसा मिळण्याचे दुसरे साधन म्हणजे सरकार. सरकारकडून आज हा पैसा कोणाला व कसा मिळतो ?

**वशिला पद्धत:**–व्यवस्थापनाशी संबंधित कोणातरी आमदाराचे/खासदाराचे/वा खुद्द व्यवस्थापकाचे सरकारदरबारी कोणत्या तरी स्तरावर वजन असते. म्हणून त्याला सरकारकडून कर्ज/अनुदान व खास प्रसंगी खास व्यवस्थापकांना दान मिळते. शासन यापुढेहि अशीच वशिला–पद्धत चालू ठेवणार आहे का ?

**योजनेची आवश्यकता:**–शाळा इमारती, ग्रंथालये, प्रयोगशाळा, खेळण्याची मैदाने, दृक्‌श्राव्य शिक्षण साधने, श्रमानुभव व समाजसेवा साधने याबाबत अशी अनिश्चित व वशिल्याची पद्धत कायम ठेवणे सर्वथा अयोग्य आहे. याकरता कराव्या लागणाऱ्या खर्चाकरता उत्पन्नाच्या मार्गांची तसेच शाळा इमारती व इतर शैक्षणिक साधनांच्या वाढीची निश्चित योजना आखणे आवश्यक आहे.

**विकास कोश योजना:**–अनावर्ति खर्चाकरता लागणारा सर्वच पैसा सरकार आपल्या आयव्ययपत्रकातून देऊ शकेल असे आम्हाला मुळीच वाटत नाही. ज्ञानगंगा जनसागराला मिळविण्याचे हेतूने ज्या पाल्यांना अधिकाधिक प्रमाणात शिक्षणसोई व साधने विना–फी उपलब्ध करून द्यावयाची त्या सर्वांकडून आजच्या परिस्थितीत शिक्षणविकासकर म्हणून दरमहा विशिष्ट रक्कम

घेतल्याशिवाय नजीकच्या भविष्यकाळात शिक्षण साधनांचा विकास शक्य नाही असे आमचे मत आहे. आज अनेक शाळा विद्यार्थ्यांकडून–इबीसी विद्यार्थ्यांकडूनहि–हा पैसा घेत आहेत याची जाणीव तसेच आजपर्यंत अती पूर्वकाळी मिळविलेल्या वर्गण्या/देणग्या सोडल्या तर अनावर्ती खर्चाचा पैसा प्रमुखतः पालकांकडूनच वसूल केला गेला आहे, याचीहि जाणीव सरकारने ठेवल्यास असा निर्णय घेणे सरकारला जड वाटू नये.

**विकासकोशाचा विनियोग कसा करावा ?**:–विद्यार्थ्यांकडून दरमहा विशिष्ट रकम नियमानुसार जमवायची तर ही रकम साहजिकच अधिक विद्यार्थ्यांच्या नागरी मोठ्या शाळेत पुष्कळ जमा होईल व कमी विद्यार्थ्यांच्या शाळात कमी जमा होईल. मोठ्या व लहान शाळेच्या व्यवस्थापनाला आपल्या शाळेतील रकम आपल्याच शाळेच्या विकासाकरता आपल्या इच्छेनुसार खर्च करण्याची परवानगी ठेवली तर पुन्हा गरीब ग्रामीण अविकसित अल्प शिक्षण-साधने असलेल्या शाळांचा मोठा गट आणि श्रीमंत, शिक्षणसाधने–संपन्न शाळांचा लहान गट अशी स्थिती होईल. क्रमाने या दोन गटातील दरी रुंदावत जाईल. अशी दरी रुंदावू देणे सर्वथा अनिष्ट आहे. म्हणून ही कायद्याने वसूल केलेली विकास कोश रकम विशिष्ट स्तरावर, उदा. जिल्हा स्तरावर एकत्र जमा करण्याची पद्धती असावी. त्यात शासनाने शासनाच्या सर्व साधारण उत्पन्नातून भर घालावी व जिल्ह्यातील सर्व शाळांच्या इमारती व अन्य शिक्षणसाधने क्रमाने वाढविण्याची योजना आखली जावी. विकास कोशाचा उपयोग अशा पद्धतीनेच केला तर सर्व शाळांचा योजनाबद्ध विकास होईल.

**खाजगी व्यवस्थापनाचे स्वतंत्र व्यक्तित्त्व अनिष्ट**:–अशाप्रकारची विकास योजना करावयाची तर त्या योजनेत व्यवस्थापनाचे स्वतंत्र व्यक्तित्त्व कायम राखणे/राहणे इष्ट व पोषक होणार नाही.

**महत्त्वपूर्ण प्रश्न**:–आतापर्यंतच्या विवेचनावरून जो महत्त्वपूर्ण प्रश्न आपणासमोर उभा राहतो तो खालीलप्रमाणे:–

(अ) शैक्षणिक जीवनाशी एकरूप होऊ पाहणाऱ्या शिक्षकाला सुसह्य जीवन देण्यास असमर्थ ठरलेले,

(आ) शिक्षणसंस्थांची अनियंत्रित वाढ करवून सामान्य करदात्याच्या पैशाचा अपव्यय करविणारे,

(इ) ज्ञाती–जाती, श्रीमंत–गरीब वर्ग–राजकीयपक्ष यातील भेद वाढते ठेवणारे,

(ई) आवर्ती खर्च आगाऊ मागणारे व अडीच/एक टक्का भागीदारी करण्यास असमर्थ ठरलेले,

(उ) तरीहि अधिकार व सवलती पूर्ववत्‌ ठेवू पाहणारे,

(ऊ) शिक्षणसंस्थेच्या उत्पन्नावर स्वतः जगणारे,

(ए) सत्तेच्या/मत्तेच्या केंद्रीकरणास सहाय्यभूत होणारे,

(ऐ) भावी शैक्षणिक विकासाच्या आयोग पुरस्कृत मार्गावर अडसर ठरणारे,

# ७

# स्वायत्तमंडळातर्फे व्यवस्थापन

आतापर्यंतच्या विवेचनावरून शैक्षणिक हिताच्या दृष्टीने शिक्षणाचे व्यवस्थापन यापुढे शक्य तो खाजगी शिक्षणसंस्थेकडे नसावे ही गोष्ट स्पष्ट झाली आहे. आज व्यवस्थापनात निर्माण झालेले दोष इतके विविध आणि प्रचंड आहेत की ते व्यवस्थापन कायम ठेवून ते सुधारणे अशक्य आहे. दुसरी गोष्ट म्हणजे शिक्षणाचा विकास–विस्तार अजून बराच व्हावयाचा आहे. ते कार्य या जीर्ण–शीर्ण यंत्रणेकडून होईल ही अपेक्षा आत्मवंचना ठरेल. इतर कोणत्याहि देशात शिक्षणासारखा महत्त्वाचा राष्ट्रीय उद्योग इतक्या मोठ्या प्रमाणावर खाजगी संस्थांवर सोपविल्याचे आढळत नाही. भारतात तो तसा आहे, ही केवळ काही विशिष्ट ऐतिहासिक परिस्थितीतील घटना आहे. शिक्षणाचा हा प्रचंड व्याप खाजगी संस्थांकडे न ठेवण्याची कारणे मुख्यतः दोन गटात आम्ही विभागली आहेत (१) खरे शैक्षणिक कार्य करण्याची दृष्टी या खाजगी संस्थांच्या चालकात नाही; ते फार तर फक्त प्रसाराचे कार्य करतात–संख्यात्मक विकास साधतात (२) दुसरे कारण खाजगी व्यवस्थापन त्यात निर्माण झालेल्या दोषांमुळे शिक्षणाच्याच मुळावर येत आहे, भावी काळातील शैक्षणिक विकासास ते पोषक नाही, हे होय.

शिक्षणाचे व्यवस्थापन खाजगी संस्थांकडे ठेवावयाचे नाही तर मग त्याचे 'सरकारीकरण' करावयाचे काय ? की त्याला काही अन्य पर्याय आहे ? या

प्रश्नाची चर्चा करण्यापूर्वी दोन महत्त्वाच्या गोष्टींचा खुलासा गैरसमज टाळण्यासाठी करणे आवश्यक आहे.

**शैक्षणिक स्वातंत्र्य**:–आजवर आम्ही शैक्षणिक स्वातंत्र्याचा हिरिरीने पुरस्कार करीत आलो आहोत. खाजगी व्यवस्थापन नको म्हटले की शैक्षणिक स्वातंत्र्याला काही अर्थ रहाणार आहे काय ? या प्रश्नाचे उत्तर असे आहे की शिक्षणाचे व्यवस्थापन आणि शैक्षणिक स्वातंत्र्य या दोन गोष्टी भिन्न आहेत. आज बहुतेक लोकशाहीनिष्ठ देशात (अमेरिका, इंग्लंड) शिक्षणाचे व्यवस्थापन बव्हंशी 'सार्वत्रिक' (पब्लिक) म्हणजे जनतेच्या प्रतिनिधींनी बनलेल्या सरकारकडे आहे. स्थानिक स्वराज्य संस्थांमार्फत व्यवस्थापन चालते आणि तरीही फार मोठ्या प्रमाणात तेथील शैक्षणिक संस्था स्वातंत्र्य उपभोगतात. उलट आपल्या देशात राज्यव्यवस्था लोकशाहीची असून आणि व्यवस्थापन लोकशाहीचा सांगाडा असलेल्या खाजगी संस्थांकडे असून त्यात स्वातंत्र्य कमी आहे. याचे कारण एकाबाजूने सरकारी शालेय नियमावली व दुसऱ्या बाजूने संचालकांची धोरणे यांच्या कात्रीत आमचे शिक्षण सापडले आहे. उलट व्यवस्थापनाचा नवा पर्याय शोधताना अन्तर्गत व्यवस्थेत व शैक्षणिक कार्यात जास्तीत जास्त स्वातंत्र्य कसे राहील, याचाचा विचार आपल्याला करावयाचा आहे.

दुसरी गोष्ट यच्चयावत् शिक्षण खाजगी शिक्षणसंस्थांकडून काढून घ्यावे, अशी आमची विचारसरणी नाही. ज्या शाळा आजही निष्ठेने व ध्येयवादाने कार्य करीत आहेत आणि शैक्षणिक गुणवत्ता वाढविण्याचे सामर्थ्य-त्यांच्यात आहे, तशी साधन संपत्ती–इमारती, साहित्य, कार्यक्षम मनुष्यबळ–त्यांच्याजवळ आहे, त्या तशाच चालू ठेवण्याला आमची हरकत नाही. फक्त कोठारी शिक्षण आयोगाने सुचविल्याप्रमाणे त्या समान शाळा पद्धतीत आणल्या जाण्यात; किंवा 'विकासबीजांचे संवर्धन करणाऱ्या प्रयोगिक शाळा' म्हणून त्यांना स्थान द्यावे. आमचा 'खाजगी व्यवस्थापना'ला विरोध आहे, तो खाजगी व्यवस्थापनात आजच्या परिस्थितीत निर्माण झालेल्या दोषांमुळे व त्यात स्वीकारल्या गेलेल्या शिक्षणाला व शिक्षकाला मारक ठरणाऱ्या ध्येय-धोरणांमुळे आहे. प्रामुख्याने स्वातंत्र्योत्तर निघालेल्या व संस्थानिकी स्वरूप धारण केलेल्या बहुसंख्य शाळात म्हणजे आजच्या सर्वसाधारण (average) शाळेत असे दोष फार मोठ्या प्रमाणात आहेत. ते दोष सुधारण्यापलीकडे गेले आहेत. ही पद्धती आता कालबाह्य झाली आहे म्हणून ती बदलावी यावर आमचा शैक्षणिक दृष्ट्या प्रामुख्याने भर आहे. शिक्षणतज्ञांनी भूतकाळाकडे दृष्टी लावायची नसते. त्यांनी भविष्या-

(इ) ज्ञाती–जाती, श्रीमंत–गरीब वर्ग–राजकीयपक्ष यातील भेद वाढते ठेवणारे,

(ई) आवर्ती खर्च आगाऊ मागणारे व अडीच/एक टक्का भागीदारी करण्यास असमर्थ ठरलेले,

(उ) तरीहि अधिकार व सवलती पूर्ववत् ठेवू पाहणारे,

(ऊ) शिक्षणसंस्थेच्या उत्पन्नावर स्वतः जगणारे,

(ए) सत्तेच्या/मत्तेच्या केंद्रीकरणास सहाय्यभूत होणारे,

(ऐ) भावी शैक्षणिक विकासाच्या आयोग पुरस्कृत मार्गावर अडसर ठरणारे,

खाजगी व्यवस्थापन आपण कायम ठेवणार आहो का ? समाजाच्या विकासास योग्य होईल असेच समाजसंस्था–व्यवस्थापन निर्माण करणे व राखणे विकासक्षम समाजाचे लक्षण/कर्तव्य आहे. शिक्षणतज्ञांची ती जबाबदारी आहे. भारताच्या शैक्षणिक विकासास संपूर्णपणे पोषक होईल असे नवे शिक्षण–संस्था-व्यवस्थापन आपण निर्माण करणे आज अवश्य आहे. असे व्यवस्थापन कोणते ?

आतापर्यंतच्या विवेचनावरून शैक्षणिक हिताच्या दृष्टीने शिक्षणाचे व्यवस्थापन यापुढे शक्य तो खाजगी शिक्षणसंस्थेकडे नसावे ही गोष्ट स्पष्ट झाली आहे. आज व्यवस्थापनात निर्माण झालेले दोष इतके विविध आणि प्रचंड आहेत की ते व्यवस्थापन कायम ठेवून ते सुधारणे अशक्य आहे. दुसरी गोष्ट म्हणजे शिक्षणाचा विकास–विस्तार अजून बराच व्हावयाचा आहे. ते कार्य या जीर्ण–शीर्ण यंत्रणेकडून होईल ही अपेक्षा आत्मवंचना ठरेल. इतर कोणत्याहि देशात शिक्षणासारखा महत्त्वाचा राष्ट्रीय उद्योग इतक्या मोठ्या प्रमाणावर खाजगी संस्थांवर सोपविल्याचे आढळत नाही. भारतात तो तसा आहे, ही केवळ काही विशिष्ट ऐतिहासिक परिस्थितीतील घटना आहे. शिक्षणाचा हा प्रचंड व्याप खाजगी संस्थांकडे न ठेवण्याची कारणे मुख्यतः दोन गटात आम्ही विभागली आहेत (१) खरे शैक्षणिक कार्य करण्याची दृष्टी या खाजगी संस्थांच्या चालकात नाही; ते फार तर फक्त प्रसाराचे कार्य करतात–संख्यात्मक विकास साधतात (२) दुसरे कारण खाजगी व्यवस्थापन त्यात निर्माण झालेल्या दोषांमुळे शिक्षणाच्याच मुळावर येत आहे, भावी काळातील शैक्षणिक विकासास ते पोषक नाही, हे होय.

शिक्षणाचे व्यवस्थापन खाजगी संस्थांकडे ठेवावयाचे नाही तर मग त्याचे 'सरकारीकरण' करावयाचे काय ? की त्याला काही अन्य पर्याय आहे ? या

प्रश्नाची चर्चा करण्यापूर्वी दोन महत्त्वाच्या गोष्टींचा खुलासा गैरसमज टाळण्यासाठी करणे आवश्यक आहे.

**शैक्षणिक स्वातंत्र्य:**–आजवर आम्ही शैक्षणिक स्वातंत्र्याचा हिरिरीने पुरस्कार करीत आलो आहोत. खाजगी व्यवस्थापन नको म्हटले की शैक्षणिक स्वातंत्र्याला काही अर्थ रहाणार आहे काय ? या प्रश्नाचे उत्तर असे आहे की शिक्षणाचे व्यवस्थापन आणि शैक्षणिक स्वातंत्र्य या दोन गोष्टी भिन्न आहेत. आज बहुतेक लोकशाहीनिष्ठ देशात (अमेरिका, इंग्लंड) शिक्षणाचे व्यवस्थापन बव्हंशी 'सार्वत्रिक' (पब्लिक) म्हणजे जनतेच्या प्रतिनिधींनी बनलेल्या सरकारकडे आहे. स्थानिक स्वराज्य संस्थांमार्फत व्यवस्थापन चालते आणि तरीही फार मोठ्या प्रमाणात तेथील शैक्षणिक संस्था स्वातंत्र्य उपभोगतात. उलट

[illegible] न आणि व्यवस्थापन लोक-
[illegible] न त्यात स्वातंत्र्य कमी आहे.
[illegible] ी व दुसऱ्या बाजूने संचाल-
[illegible] े आहे. उलट व्यवस्थापनाचा

नवा पर्याय शोधताना अन्तर्गत व्यवस्थेत व शैक्षणिक कार्यात जास्तीत जास्त स्वातंत्र्य कसे राहील, याचाचा विचार आपल्याला करावयाचा आहे.

दुसरी गोष्ट यच्चयावत् शिक्षण खाजगी शिक्षणसंस्थांकडून काढून घ्यावे, अशी आमची विचारसरणी नाही. ज्या शाळा आजही निष्ठेने व ध्येयवादाने कार्य करीत आहेत आणि शैक्षणिक गुणवत्ता वाढविण्याचे सामर्थ्य-त्यांच्यात आहे, तशी साधन संपत्ती–इमारती, साहित्य, कार्यक्षम मनुष्यबळ–त्यांच्याजवळ आहे, त्या तशाच चालू ठेवण्याला आमची हरकत नाही. फक्त कोठारी शिक्षण आयोगाने सुचविल्याप्रमाणे त्या समान शाळा पद्धतीत आणल्या जाण्यात; किंवा 'विकासबीजांचे संवर्धन करणाऱ्या प्रयोगिक शाळा' म्हणून त्यांना स्थान द्यावे. आमचा 'खाजगी व्यवस्थापना'ला विरोध आहे, तो खाजगी व्यवस्थापनात आजच्या परिस्थितीत निर्माण झालेल्या दोषांमुळे व त्यात स्वीकारल्या गेलेल्या शिक्षणाला व शिक्षकाला मारक ठरणाऱ्या ध्येय-धोरणांमुळे आहे. प्रामुख्याने स्वातंत्र्योत्तर निघालेल्या व संस्थानिकी स्वरूप धारण केलेल्या बहुसंख्य शाळात म्हणजे आजच्या सर्वसाधारण (average) शाळेत असे दोष फार मोठ्या प्रमाणात आहेत. ते दोष सुधारण्यापलीकडे गेले आहेत. ही पद्धती आता कालबाह्य झाली आहे म्हणून ती बदलावी यावर आमचा शैक्षणिक दृष्ट्या प्रामुख्याने भर आहे. शिक्षणतज्ज्ञांनी भूतकाळाकडे दृष्टी लावायची नसते. त्यांनी भविष्या-

कडे पाहावयाचे असते. तो उज्ज्वल करण्याची जबाबदारी त्यांच्यावर असते. यापुढील ग्रामीण व नागरी विभागातील शैक्षणिक प्रगती झपाट्याने व योजनाबद्ध कशी होईल, ती प्रगती राष्ट्रविकासाची उद्दिष्टे सफल करण्यास कशी उपयोगी पडेल, लोकशाहीच्या वाढीला पोषक ठरेल अशा तऱ्हेनेच ती कशी होईल–अशा काही निकषावर व्यवस्थापनाचा विचार त्यांनी करावयाला हवा. एकप्रकारे शिक्षणक्षेत्रातील 'सनातनी व सुधारक', परंपरावादी व प्रगमनशील असा हा संघर्ष आहे. विकसनशील देशाने प्रगमनशील धोरणे स्वीकारणे हे त्याच्या हिताचे आहे. एवढा खुलासा केल्यानंतर खाजगी व्यवस्थापनाला पर्याय कोणता याचा विचार करू.

**सरकारीकरण होऊ नये:**–खाजगी व्यवस्थापन नको असे म्हटले की शाळांचे सरकारीकरण हा एकच मार्ग उरतो अशी सर्वसाधारण समजूत आहे. शाळा सरकारी नकोत असा ग्रह परकीय सरकारच्या काळापासून चालत आला आहे. सरकारी विरुद्ध खाजगी या वादात जनमताचा कौल नेहमीच खाजगी व्यवस्थापनाला अनुकूल असल्यामुळेहि शाळांचे सरकारीकरण होऊ नये या मताला आपोआपच बळकटी येते. अलीकडे ज्या आर्थिक व्यवहारात सरकार पडले तो व्यवहार, कंपनी वा कारखाना, कार्यक्षम पद्धतीने चालविला गेला नाही असा अनुभव आहे. केवळ या अनुभवामुळेच नव्हे तर सैद्धान्तिक दृष्टीनेहि शिक्षणसंस्थांचे सरकारीकरण होऊ नये असा आमचाहि आग्रह आहे.

भारताने लोकशाही हा जीवनाचा मार्ग म्हणून स्वीकारला आहे. शिक्षणसंस्थांचे सरकारीकरण लोकशाही जीवनास पोषक नाही. सरकारीकरणाने विद्यार्थ्यांच्या संस्कारक्षमवयात राज्यकर्त्या राजकीय पक्षांचे आग्रही संस्कार होण्याची भीति असते. बदलत्या अधिकारारुढ राजकीय पक्षानुरूप शिक्षणधोरणे प्रत्यक्ष व्यवस्थापनाच्या प्रकारातून बदलण्याची भीति असते. सर्व साम्यवादी देशात, हेच घडते. सुप्त गुणांना मुक्त करून त्यांना सदा वर्धिष्णु ठेवण्याचे शुद्ध शैक्षणिक धोरण सरकारीकरणाने साध्य होणे कठीण असते. म्हणून सैद्धान्तिक व व्यावहारिक दृष्टीनेहि लोकशाही राज्यात शिक्षणसंस्थांचे सरकारीकरण अनिष्ट असते.

**सहकारी व्यवस्थापन सदोष व दुबळे :**–सरकारीकरण नको तर शिक्षकाचे सहकारी व्यवस्थापन असावे असे मत प्रतिपादिले जाते. खाजगी व्यवस्थापन बदलावे याकरता जी कारणे वर सांगितली आहेत अगदी त्याच कारणांमुळे

सहकारी व्यवस्थापनहि शैक्षणिक विकासास उपकारक होणे अशक्य आहे. शिक्षकांची सहकारी मंडळे स्थापल्यास वाद अधिक माजतील व अध्यापनावरून शिक्षकांचे लक्ष उडेल. शिक्षणक्षेत्रातील शिक्षकांचे स्वातंत्र्य व लोकशाहीवृत्ती मान्य करूनहि सांगावेसे वाटते की शालेय व्यवस्थापनात प्रशासनाला बरेच महत्त्व असते. सहकारी पद्धतीत शाळेचे प्रशासन दुबळे बनण्याचा फार मोठा धोका आहे. आजीव सेवक पद्धतीत हे सिद्धही झाले आहे.

**स्वायत्त मंडळ एवढाच परिणामकारक पर्याय :–**खाजगी व्यवस्थापन कालबाह्य झालेले आहे व अत्यत दोषग्रस्त आहे; सरकारीकरण लोकशाहीशी विसंगत आहे, आणि सरकार पद्धती अव्यवहार्य आहे, असे ठरल्यावर विद्यमान भारतीय परिस्थितीत पर्याय उरतो तो **स्वायत्त मंडळाचाच.** स्वायत्त मंडळे ही कायद्याने निर्माण झाली की ती सरकारी चाकोरीच्या बाहेर राहतील; ती खाजगी नसल्याने खाजगी संस्थांचे दोष त्यात असणार नाहीत. आज तरी भारताच्या शैक्षणिक विकासास तेच पोषक ठरेल. मंडळातर्फे स्वायत्त होणारे शासन हे लोकशाहीशी सुसंगत आहे.

स्वायत्तमंडळातर्फे प्रशासन म्हणजे सरकारीकरण नव्हे हे प्रथम लक्षात घेतले पाहिजे म्हणूनच लोकशाही हा जीवनमार्ग स्वीकारलेल्या व समाजवादी समाजरचनेचे उद्दिष्ट डोळ्यासमोर असणाऱ्या अनेक राज्यांनी आपल्या आर्थिक व्यवहाराकरिता ही पद्धती स्वीकारली आहे.

**भारतात अवलंब :–**स्वातंत्र्योत्तर काळात भारतातही आपण स्वायत्तमंडळातर्फे आर्थिक व अन्य व्यवहारांचे व्यवस्थापन अधिकाधिक प्रमाणात करण्यास सुरवात केली आहे. त्यापैकी कारखानदारी क्षेत्रातील म्यनेजिंग एजन्सीचे प्रथम नियंत्रण व आता पोलाद, विमा आदिचे स्वायत्तमंडळातर्फे केलेले व्यवस्थापन यांचा उल्लेख 'पुस्तिकेचे प्रयोजना'त सुरवातीसच केला आहे. महाराष्ट्रातील 'एस. टी.' अशाच प्रकारच्या स्वायत्तमंडळातर्फेच चालते हे आपल्या परिचयाचे आहे.

खुद्द शिक्षणक्षेत्रातही अलीकडील 'राज्य माध्यमिक शिक्षण मंडळ' हे स्वायत्तमंडळच आहे. परीक्षा, पाठ्यपुस्तकांना मान्यता, शाळांना मान्यता अशा महत्त्वपूर्ण बाबी प्रत्यक्ष वा पर्यायाने या मंडळाकडे देण्यात आल्या आहेत. आता आमचे म्हणणे एवढेच की शिक्षक–मुख्याध्यापकांच्या नेमणुकासह व्यवस्थापन, शाळांच्या इमारती व साधन सामग्री यांच्या विकासाची तसेच नव्या शाळा

उघडण्याची जबाबदारी यासाठी अशीच मंडळे जिल्हास्तरावर कायद्याद्वारे स्थापन व्हावीत व शिक्षणाच्या व्यवस्थापनात एकसूत्रता यावी. शैक्षणिक प्रगतीला असे व्यवस्थापन उपकारक ठरेल.

**प्रस्तावित कायदा** :–महाराष्ट्र शासन माध्यमिक शाळा व्यवस्थापनातील दोष दूर करण्यासाठी कायदा करणार असल्याचे घोषित झाले आहे. शतधा विखुरलेली व्यवस्पापनमंडळे कायम ठेवून व्यवस्थापनात सूसूत्रता व व्यवस्थितपणा आणणे अशक्य आहे. खाजगी व्यवस्थापनाचे स्वतंत्र व्यक्तित्त्व कायम ठेवून त्यांचेवर कायद्याचा अंकुश उत्पन्न केला तर न्यायालयातील वादावादी फार मोठा प्रमाणात निर्माण होईल व त्या कटकटी चालू राहात जातील. शिक्षणव्यवस्थापनास हे हितावह होणार नाही. खाजगी व्यवस्थापनाचे जागी स्वायत्तमंडळे स्थापून त्यांच्या द्वारा सुनियंत्रित व्यवस्था निर्माण करणे हेच हितावह होईल.

**सूचना** :–शिक्षणसंस्थांचे व्यवस्थापन व विकासाकरता तीन भिन्न स्तरावर कायद्याद्वारे स्वायत्तमंडळे स्थापन करावी, असे आम्ही सुचवितो.

**स्वायत्तमंडळांची रचना** :–स्थूलमानाने या मंडळांची रचना पुढीलप्रमाणे असावी.

(१) (अ) विकासगटस्तरावर प्राथमिक शिक्षण व्यवस्थापन मंडळ,

(ब) जिल्हास्तरावर माध्यमिक शिक्षण व्यवस्थापन मंडळ,

(क) विभागीय स्तरावर उच्चशिक्षण व्यवस्थापन मंडळ, अशी तीन स्तरावर मंडळे असावी.

(२) त्या त्या क्षेत्रातील त्या स्तरावरील सर्व शिक्षणसंस्थांचे, पूर्व उल्लेखित अपवाद वगळता, व्यवस्थापन व विकासाचे कार्य त्यांचेकडे सोपवावे,

(३) त्या त्या स्तरावरील मंडळांचे कायदे, तदंतर्गत नियम व उपनियम समान असावे, स्थानिक परिस्थिती लक्षात घेता त्यात बदल करणे अवश्य असल्यास ते राज्यशासनाच्या पूर्व परवानगीने करावे,

(४) सर्व मंडळाकरता सल्लागारमंडळे असावी, त्यांचे सल्ल्याने व्यवस्थापनाच्या व विकासाच्या योजना ठरविल्या जाव्या,

(५) त्या योजना प्रत्यक्षात अंमलात आणण्याची जबाबदारी त्या त्या मंडळाचे वैतनिक अध्यक्ष व वैतनिक कार्यवाहांची असावी,

(६) शाळांचा १०० टक्के आवर्ती खर्च राज्यशासनाने सोसावा,

(७) त्या स्तरावर आम्ही सुचविलेला–विकाशकोश, त्यात शासनाच्या रकमेची भर घालून, त्या क्षेत्रातील संस्थांच्या योजनाबद्ध विकासाकरता उपयोगात आणावा,

(८) त्या क्षेत्रातील नागरिकांनी चीजवस्तू, रोकड, जमीन आदि रूपाने दिलेल्या देणग्यांचा उपयोग त्याच क्षेत्रातील मुलांच्याकरता होईलच असे आश्वासन द्यावे,

(९) त्या क्षेत्रातील त्या स्तरावरील शिक्षणसंस्थांचे व्यवस्थापन करणारी स्वायत्तमंडळ ही एकमेव संस्था असावी, (ज्या शाळा सर्वस्वी स्वतःचे आर्थिक बळावर स्वतंत्र राहू इच्छितात त्याच या स्वायत्तमंडळाचे अधिकाराबाहेर राहू द्याव्या).

**प्राथमिक शिक्षण व्यवस्थापन** :–आज प्राथमिक शाळा प्रमुखतः जिल्हा व नगरपरिषदा चालवितात. माध्यमिक शाळांच्या व्यवस्थापनात ज्याप्रमाणे शैक्षणिक दृष्टी नसते त्याप्रमाणे उपरोक्त स्थानिक स्वराज्यसंस्थांतील संबंधित मंडळांनाहि नसते. पाच वर्षाकरता तरी आपणच मालक आहोत या भावनेने शिक्षकांना पदाधिकारी वागवितात. पदाधिकाऱ्यांना शाळांच्या प्रत्यक्ष व्यवस्थापनाकडे सूक्ष्मपणे पाहण्यास वेळ व कार्यक्षमता नसतेच उलट त्यांना शिक्षण व्यवस्थापनाव्यतिरिक्त अन्य धोरणे संभाळावयाची असतात म्हणून त्यांच्या त्या धोरणांचेही प्रतिकूल पडसाद शिक्षण व्यवस्थापनात उमटतात.

शिक्षकहि निकटच्या स्वार्थाने वा अपरिहार्यपणे पक्ष व व्यक्तीगटात सामील होतात व त्यांचे राजकारणात भाग घेतात. यामुळे शैक्षणिक वातावरण फार गढूळ होते. त्यामुळे ज्या मंडळाला प्राथमिक शाळांचे व्यवस्थापन व विकास एवढेच कार्य आहे, व ज्यांचे सल्लागारमंडळ तज्ञांचे आहे व अधिकारी तज्ञ आहेत, अशाच मंडळांकडे प्राथमिक शाळांचे व्यवस्थापन व विकासाचे कार्य देणे इष्ट ठरेल.

**महाविद्यालयीन शिक्षण व्यवस्थापन** :–महाविद्यालयीन शिक्षणप्रसार व महाविद्यालयांची स्थापना गेल्या काही वर्षात माध्यमिक शाळाप्रमाणेच द्रुतगतीने व अनियंत्रितपणे झाली आहे. माध्यमिक शिक्षणसंस्थांच्या प्रसारात व व्यवस्थापनात जे दोष आढळतात तेच दोष खाजगी महाविद्यालयांच्या व्यवस्थापनातहि वाढत आहेत. महाविद्यालयांची वाढ व महाविद्यालयीन शिक्षणाचा विकास ज्या दृष्टीने व मार्गांनी व्हावयास पाहिजे वे व माध्यमिक शिक्षणविकासाचे मार्ग

एकच आहेत, म्हणून विभागीय स्तरावर महाविद्यालयांची स्थापना व विकास याकरिता स्वायत्तमंडळ असणे इष्ट ठरेल.

**तीन स्तर का ?** :--स्वायत्तमंडळांचा कारभार कार्यक्षम व्हावा म्हणून एकेका मंडळाकडे व्यवस्थापनाकरता फार जास्त शाळा वा महाविद्यालये नसावीत. एका विकासगटातील प्राथमिक शाळांची आजची व भावी संख्या पाहता प्राथमिक शाळा स्वायत्तमंडळ प्रत्येक विकासगटाकरता असावे तर माध्यमिक शाळा संख्या व महाविद्यालयांची संख्या पाहता माध्यमिक शाळामंडळ प्रत्येक जिह्याकरता तर महाविद्यालयमंडळ विभागाकरता असणे इष्ट होईल.

**अपेक्षित आक्षेप व त्यांचे निरसन**:–शिक्षण व्यवस्थापन स्वायत्तमंडळाच्या स्वाधीन करावे या सूचनेवर काही आक्षेप अपेक्षित आहेत.

**(१) दोष व गैरकारभार राहणारच**:–खाजगी व्यवस्थापनात वशिला, दडपण, जातीय व राजकीय पक्षवृत्ति आदि जे दोष आढळतात ते स्वायत्तमंडळाच्या व्यवस्थापनातहि आढळणार नाहीत काय ? आणि जर आढळणार असतील तर मग स्वायत्तमंडळ कशाला ? असा प्रश्न विचारला जाईल.

वशिला, दडपण आणणे आदि जे दोष आजच्या समाजात आहेत त्यांचे प्रतिबिंब सर्व समाजसंघटनात पडणारच हे मान्य करायला हवेच. त्याप्रमाणे स्वायत्तमंडळाच्या कारभारात काही प्रमाणात ते दिसणे शक्य आहे.

पण प्रथम कोणीही एक गोष्ट मान्य करील की स्वायत्तमंडळाच्या व्यवस्थापनात कागदी नगदी पगारातील तफावत व सरकारी पैशाचा अन्यत्र उपयोग व दुरुपयोग व सरकारशी फसवाफसवी आदि दोष राहणार नाहीत. या शिवाय वशिला, दडपण आदि दोषहि कमी होतील. कसे ते पहा.

**वशिला दडपण आदि दोष कमी होतील**:–आज महाराष्ट्रातील ४२०० शाळा चालविणारी एक हजार व्यवस्थापन मंडळे आहेत असे आपण मानू. कोणत्याहि व्यवस्थापन मंडळात सुमारे दहा व्यक्ति अशा असतात की ज्यांचेकडून शाळांच्या व्यवस्थापनाकडे नेहमी लक्ष दिले जाण्याची अपेक्षा केली जाते. अशाप्रकारे एक हजार व्यवस्थापनात दहा हजार व्यक्ति आज प्रत्यक्ष–अप्रत्यक्षपणे शाळांतील, नेमणुका, बढत्या, बदल्या आदि कारभारात लक्ष घालतात, म्हणजे तूर्तच्या मुद्याच्या चर्चेच्या दृष्टीने वशिला, दडपण आणणे इत्यादि गोष्टी करू शकतात. आमच्या सूचनेप्रमाणे २६ स्वायत्तमंडळे स्थापन केली तर एकूण सल्लागार ५२० राहतील. दैनंदिन कार्यक्षम व्यवस्थापनाची

५५१८६५ ५१ ८२०५ २०।३।८

मुख्य जबाबदारी वैतनिक अधिकाऱ्यांवर राहील हे आपण प्रथम ध्यानी बाळगले तर सल्लागार वशिला आदि कमी करू शकतील असे मानण्यास हरकत नसावी.

जो अधिकार आजचे दहा हजार व्यवस्थापक वापरतात तितकाच हे पाचशेवीस सल्लागार पर्यायाने वापरतील असे मानले तरीही हे स्पष्ट आहे व मान्य केलेच पाहिजे की १०००० लोकांनी केलेल्या ढवळाढवळीपेक्षा ५२० लोकांनी केलेली ढवळाढवळ नेहमी कमीच राहील.

सल्लागार मालक/व्यवस्थापक म्हणून राहणार नाहीत. शैक्षणिक दृष्टी असलेले व स्थानिक/विभागीय मदत मिळवून देण्यास समर्थ असलेले ते राहतील, म्हणूनच त्यांची नियुक्ती होईल. म्हणूनहि त्यांचा कारभार चांगलाच सुधारलेला राहील अशी अपेक्षा बाळगणे योग्य होईल.

**सरकारचे नियंत्रण ?**:–स्वायत्तमंडळावर ज्या काही नेमणुका करण्याचा अधिकार सरकारला राहील त्यांचे द्वारे सरकार अप्रत्यक्षपणे स्वायत्तमंडळावर ताबा चालवील, याही म्हणण्यात काही तथ्य आहे. आपण आज शिक्षणक्षेत्रात-सुद्धा विद्यापीठे, शिक्षणमंडळे आदि अनेक स्वायत्तमंडळे चालवीत आहोत. त्यांचा कारभार व त्यावरील सरकारी नियंत्रण जितके व जसे आहे तसे या स्वायत्तमंडळावर राहील, हे मान्यच केले पाहिजे. राज्यशासनाची कितीहि वाईट परिस्थिती असली तरी शेवटी जोपर्यंत ज्यांचे हाती राज्यशासन आह तोपर्यंत त्यांचे अंतिम नियंत्रण अप्रत्यक्ष वा प्रत्यक्षहि मानावेच लागेल. ते संपूर्णतः टाळणे कधीच शक्य होत नाही याची स्पष्ट जाणीव ठेवायला हवी.

**उपक्रमशीलता मारली जाईल काय ?**:–शिक्षणाचा कारभार खाजगी व्यवस्थापनाकडून काढून घेतला तर उपक्रमशीलतेला धोका पोहोचेल असा युक्तिवाद करण्यात येतो. उपक्रमशीलता कशाबद्दल व ती कुणाकडून अपेक्षित आहे ?

उपक्रमशीलतेचा खरा संबंध शैक्षणिक कार्याशी आहे. ती उपक्रमशीलता मुख्याध्यापक व शिक्षक यांच्या उत्साहावर आणि प्रयोगशीलतेवर अवलंबून असते. व्यवस्थापक मंडळी नव्या शैक्षणिक उपक्रमाबद्दल मुग्धच असतात, शिक्षणात त्यांना फारसे कळत नसते, आणि आर्थिक बोजा वाढत असेल तर बहुधा नव्या उपक्रमांना ते विरोधच करतात. आज शेकडो शाळा खाजगी व्यवस्थापनाखाली आहेत. त्या कितीशा उपक्रमशील आहेत ? या उलट काही शासकीय शाळाही उपक्रमशील आढळतातच ना ! आमचे तर म्हणणे असे आहे की स्वायत्तमंडळाकडे शैक्षणिक कारभार गेला तर मुख्याध्यापकांची निवड

अधिक कसोशीने व गुणवत्ता पाहून करता येईल. आजच्याप्रमाणे ती व्यवस्थापकांच्या मर्जीवर, सोयीवर वा आजीव सदस्य पद्धतीतील राजकारणावर अवलंबून असणार नाही. उपक्रमशील मुख्याध्यापकांना सेमिनार रिडिंग कार्यक्रमात आहे त्याप्रमाणे व अधिक मोठ्या शाळेवर बढती आदि काही प्रलोभन ठेवले तर शैक्षणिक उपक्रमशीलता आजच्यापेक्षा अधिक प्रमाणात प्रगटण्यास संधी मिळेल. आज अनेक उत्साही शिक्षक नव्या गोष्टी करू इच्छितात, पण जुन्या चाकोरीतील मुख्याध्यापक–व्यवस्थापकांना त्यांचे महत्त्व समजत नाही. स्वायत्त-मंडळाकडे प्रशासकीय कारभार पण अंतर्गत शैक्षणिक व्यवहारात शाळांना स्वातंत्र्य अशी परिस्थिती निर्माण केल्यास उपक्रमशीलता कमी न होता उलट अधिक वाढीस लागेल.

**लोकाभिमुखतेला अर्धचंद्र ?** :–खाजगी व्यवस्थापनाकडून शिक्षण काढून घेतले तर त्याची लोकाभिमुखता नष्ट होईल, अशी भीती काही विचारवंत व्यक्त करतात. तीही वरीलप्रमाणेच निराधार आहे. लोकाभिमुखतेचा अर्थ काय घ्यावयाचा ? शिक्षण संस्थांचा मोहरा जनतेकडे–लोकजीवनाकडे वळलेला असावा, असा त्याचा अर्थ असेल, तर तो भाग अभ्यासक्रमाचा व अध्यापन पद्धतीचा आहे. त्याचा व्यवस्थापनाशी संबंध नाही. लोकांची तोंडे शिक्षण-संस्थांकडे वळलेली असावीत व शिक्षणसंस्थांच्या विकासाला हातभार लागावा, अशी आक्षेपकांची भूमिका असावी. तिचा विचार पुढीलप्रमाणे करता येईल.

शिक्षणसंस्थाच्या कार्यात लोकांच्या सक्रिय सहकार्याच्या काही मर्यादा ठरलेल्या आहेत–असल्या पाहिजेत. शाळेतील अभ्यासक्रम, अध्यापनपद्धती, दैनंदिन संचालन, परीक्षा इत्यादि कार्यात समाजाचा व पालकांचा हात प्रत्यक्ष नसतो व नसावा. पण त्यांच्या मताचा पालकसंघटना वा अन्य संस्था यांच्या द्वारा विचार जरूर व्हावा. समाजाने शिक्षणाला मदत एक भौतिक साधन–सामग्रीच्या रुपाने करावयाची असते. इमारती, क्रीडांगणे इत्यादीसाठी जागा वा पैसा, उपकरणासाठी साहाय्य, पारितोषिकांसाठी निधी, पुस्तकपेढीच्या योजना, विद्यार्थ्यांच्या आरोग्यासाठी सोयी–सुविधा अशा अनेक गोष्टी आहेत. आपल्या सामग्रीचा उपयोग आपल्याच गावच्या शाळेसाठी व आपल्या मुलांच्या विकासासाठी व्हावयाचा आहे असे त्यांना आश्वासन दिले तर समाज शिक्षणाभिमुख राहील. आजही प्राथमिक शाळांच्या इमारती ग्रामपंचायतीच्या, जि. प. च्या ताब्यात असता लोक सरकारी साह्य मिळवण्यासाठी आपला वाटा उचलतातच ना ? स्थानिक स्वराज्य संस्थांच्या द्वारा–प्रत्यक्ष लोकांचे नियंत्रण न स्वीकारता

लोकाभिमुखता टिकवता येईल. श्री. जे. पी. नाईक यांनी प्राथमिक शिक्षणाच्या विकासासाठी अशाच योजनांचा पुरस्कार केला आहे. एस्. एस्. सी. बोर्डात व विद्यापीठात पारितोषिकासाठी–शिष्यवृत्त्यासाठीं उदार देणग्या निरपेक्षपणे देणारे लोक आजही आहेत.

समाजातील विचारवंताच्या ज्ञानाचा लाभ शिक्षणसंस्थांना मिळणे हा एक लोकाभिमुखतेचा अर्थ होतो. संस्थेवर नियंत्रण कुणाचे याच्याशी त्याचा संबंध नाही. सरकार आणि जनता यांच्यातील अंतर जसजसे कमी होईल आणि शासक प्रशासक हे जितके लोकाभिमुख होतील, तितके हे प्रश्न त्वरित सुटतील.

**स्वायत्तमंडळ म्हणजे जिल्हापरिषद ?**:–स्वायत्तमंडळ म्हणजे जिल्हापरिषद होईल अशीहि भीति बाळगण्याचे कारण नाही. जिल्हापरिषद अनेक बाबींचा कारभार पाहते, त्यामुळे तेथील सदस्यांना 'बहुतांची अंतरे' राखावी लागतात. अनेक उद्दिष्टे व धोरणे संभाळावी लागतात. पुन्हा निवडून येण्याची आकांक्षा असते. त्यामुळे त्यांच्या कारभारात वशिला, काही बाबींकडे दुर्लक्ष, शिथिलता आदि दोष येतात. स्वायत्तमंडळाला फक्त एकच काम राहील व ते मंडळ फक्त सल्ला देईल. म्हणून कारभाराचे दृष्टीने स्वायत्तमंडळाचा कारभार जिल्हापरिषद कारभारापेक्षा निश्चितपणे अधिक कार्यक्षम राहील.

**शिक्षकांच्या बदल्या** :–स्वायत्तमंडळाद्वारे होणाऱ्या व्यवस्थापनात शिक्षकांच्या बदल्या होणे संभवते. आजच्या स्थानिक स्वराज्यसंस्था ज्या बदल्या करतात त्यामुळे बदल्याबाबतच्या विरोधाने जनमनात ठाण मांडले आहे. आजच्या बदल्यामागे हेवेदावे, वितुष्टे व विशेषतः स्थानिक राजकारण असते. ते कदाचित राहिले तरी न जाणवेल इतक्या अल्पप्रमाणात राहील. शिक्षकालाहि बदल्या नको असतात कारण त्याला आपल्या व्यवसायाव्यतिरिक्त अन्य बाबींकडे आपल्याच गावात राहून लक्ष द्यायचे असते. शिक्षणविकासाच्या दृष्टीने आपले सर्व लक्ष व्यवसायाकडे देणारे शिक्षक या व्यवसायात असणे व टिकविणे इष्ट आहे. ज्यांना बदल्यामुळे शेती, दुकानदारी करणे शक्य होणार नाही त्यांना आपल्या रुचियोग्य वा आवश्यकतेनुसार अन्य व्यवसाय निवडण्यास सांगणे शिक्षणाला उपकारक होईल. तसे ते केलेहि पाहिजे.

बदल्या झाल्याच तर लहानशा क्षेत्रातच अन्यत्र होतील त्यामुळे अन्य नैमित्तिक अडचणी सोडविणे कठीण जाणार नाही.

**संतुलन शक्य**:–काही शाळात काही विषयशिक्षकांची गर्दी आहे, ती कमी करून पदवीधर व गुणवत्ताशिक्षकांची न्याय्य प्रमाणात त्या त्या क्षेत्रात वाटणी

करता येईल. एकूण समाजाच्या शिक्षण सोईमध्ये या प्रकारे संतुलन आणता येईल.

**शिक्षकांना अन्य लाभ** :–आज शाळेत एखादा विषय बंद पडला/केला की शिक्षकाला नौकरीला मुकावे लागते. स्वायत्तमंडळाच्या कारभारात अन्य ठिकाणच्या शाळेत त्याची नियुक्ती होऊ शकेल. आज एकाद्या शिक्षकाचे व्यवस्थापकाशी/मुख्याध्यापकाशी काही कारणाने पटेनासे झाले की त्याला नौकरीतून काढण्यात येते. नव्या कारभारात त्याची बदली करता येईल.

अनेक कार्यक्षम शिक्षकांना बढतीसाठी वाव मिळेल.

**अनेक लाभ**:–आम्ही मांडीत असलेल्या योजनेचे अनेक लाभ आहेत कारण स्वायत्तमंडळाद्वारे होणाऱ्या व्यवस्थापनात शैक्षणिक दृष्टी राहील. आमच्या मते या पद्धतीमुळे

(१) खाजगी व्यवस्थापनातील शिक्षणविघातक व शिक्षकवृत्तीस मारक दोष निवारण होतील,

(२) ज्ञाती, जाती, वर्ग, राजकीय पक्ष शाळा नष्ट होतील,

(३) शैक्षणिक विकासाची नवी उद्दिष्टे नव्या मार्गाने साधण्यास मदत होईल,

(४) शाळांची वाढ योजनाबद्ध होईल,

(५) ग्रामीण व नागरी शाळांच्या समतोल विकासाची सोय होईल,

(६) ग्रामीण–नागरी/गरीब–श्रीमंत/उच्च–निम्न विद्यार्थ्यांना समान संधि मिळणे शक्य होईल,

(७) चांगल्या शिक्षकांचे वाटप समतोल प्रमाणात होईल.

(८) शिक्षकांच्या/मुख्याध्यापकांच्या कर्तृत्वास वाव मिळेल,

(९) आज खाजगी व्यवस्थापनाने शासनाला लुळे पांगळे केले आहे. कायद्याद्वारे घटित झालेल्या स्वायत्तमंडळांच्या कारभार नियमाद्वारे (रेग्युलैशन्स) चालेल, त्यामुळे शिक्षणखात्याचा लुळेपणा जाऊन त्याची कार्यक्षमता वाढेल.

**उपसंहार**–स्वातंत्र्यपूर्वकाळी खाजगी व्यवस्थापनाने त्यागाने व निष्ठेने कार्य केले म्हणून त्या व्यवस्थापनाबद्दल आम्हाला आदर आहे, त्या व्यवस्थापनाचा अनुभव आम्हाला चांगला आहे, एवढेच नव्हे तर त्यातील एक भाग म्हणून काही कामगिरी करण्याचे भाग्यहि आम्हाला लाभले आहे.

**तरी पण**:—स्वातंत्र्योत्तर काळात सर्व सामान्य व्यवस्थापनाचा घसरलेला दर्जा व त्याची आजची अकार्यक्षम व शैक्षणिक विकासास बाधक अशी स्थिती आम्ही फार जवळून अभ्यासिली आहे. आजच्या खाजगी व्यवस्थापनामुळे शिक्षणाचे मुळाशीच कीड लागली आहे, असा आमच्या अभ्यासाचा निष्कर्ष आहे. नव्या काळातील प्रश्न सोडविण्यास समर्थ व नव्या आकांक्षांना पोषक असा व्यवस्थापनाचा नवा सांचा आता आवश्यक आहे, हे या चर्चेचे फलित आहे.

खाजगी व्यवस्थापनातील शाळातून/शिक्षणसंस्थांतून तयार झालेल्या थोर विचारवंतांची प्रतिक्रिया, स्वायत्तमंडळाद्वारे शिक्षणसंस्थांचे व्यवस्थापन व्हावे या आमच्या सूचनेवर, प्रथम क्षणी प्रतिकूल राहणे साहजिक आहे. पण व्यवस्थापनाच्या आजच्या स्थितीकडे पाहून ते भावी शैक्षणिक विकासास पोषक होईल का असा विचार केल्यास प्रथम क्षणी प्रतिकूल झालेले मत बदलण्याची आवश्यकता त्यांनाहि पटेल असा आमचा विश्वास आहे.

शुद्ध शैक्षणिक हिताचे दृष्टीने सर्व संबंधित या सूचनेचा विचार करतील अशी आशा आम्ही बाळगतो.

REFBK-0018184